




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०३८ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# मुंबई जिंकण्यासाठी ठाकरे बंधू सज्ज

## मनसे-ठाकरेंच्या शिवसेनेचं जमलं, जोरदार शक्तिप्रदर्शन करणार



मुंबई : (समर्थ गांवकरी)

गेल्या अनेक दिवसांपासून ठाकरेसेना आणि मनसेचे कार्यकर्ते ज्याची आतूरतेनं वाट बघतायत तो क्षण जवळ आला आहे. संजय राऊत म्हणतात ते खरं असेल, तर उद्याच ठाकरेंच्या महायुतीची घोषणा होईल. त्यासाठी सोमवारी दिवसभर बैठकांचं जोरदार सत्र सुरू होतं. संजय राऊतांपासून बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई ही मंडळी मातोश्री आणि शिवतीर्थादरम्यान धावपळ करत होते.

ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊतांचा शब्द पडू द्यायचा नसेल, तर ठाकरे बंधूंना मंगळवारचा सूर्य उगवताच युतीची घोषणा करायला हवी. कारण 23 डिसेंबरपासून, महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरायला सुरूवात होणार आहे. आता मंगळवारच्या सूर्याला कोणकोणत्या राजकीय घडामोडी पाहायला मिळताहेत हे लवकरच कळेल. ठाकरेंच्या शिवसेनेचे संजय राऊत आणि मनसेच्या बाळा नांदगावकरांसाठी सोमवार बऱ्यापैकी दगदगीचा होता. आधी संजय राऊत राज ठाकरेंच्या निवासस्थानी पोहोचले. मग बाळा नांदगावकर आणि नितीन सरदेसाई उद्धव ठाकरेंना भेटण्यासाठी मातोश्रीवर दाखल झाले. तीन एक तासाच्या चर्चेनंतर मनसे नेत्यांनी पुन्हा एकदा राज ठाकरेंच्या घराचा रस्ता धरला. आता दोन्ही पक्षांच्या नेत्यांना एवढ्या चकरा माराव्या लागण्याचं कारण म्हणजे काही जागांवरचा तिढा.

शिवडी, दादर, माहीम, भांडुप, विक्रोळी मतदारसंघातील काही जागांवरून ठाकरेंची शिवसेना आणि मनसेमध्ये रस्सीखेच सुरू आहे. कारण हे सगळे भाग मराठीबहुल आहेत. या जागांवरून जास्त ताणू नका अशा सूचना राज ठाकरेंनी संजय राऊतांसह स्वतःच्या पक्षातील नेत्यांनाही दिला होता. सोमवारचा सूर्य मावळेस्तोवर शिवडी, दादर आणि माहीममधल्या बहुतांश प्रभागांचा तिढा सोडवण्यात दोन्ही पक्षांना यश आलं होतं. मात्र, भांडुप आणि विक्रोळीवरून रात्री उशीरापर्यंत खलबतं सुरू राहणार असल्याचं कळतंय.

हातात वेळ कमी आहे... त्यामुळे जे काही मतभेद असतील ते चर्चेनं सोडवण्याशिवाय दोन्ही ठाकरेंकडे काहीच पर्याय नाही. आजार बाजूला ठेवून संजय राऊतांनी प्रत्येक पक्षाशी चर्चा करण्याची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतलेली दिसतेय. काँग्रेसनं कितीही वेळा नकारघंटा वाजवली असली तरी, ठाकरेंच्या शिवसेनेनं काँग्रेसला सोबत घेण्याबाबत प्रयत्न सोडलेले नाहीत.

मुंबईत महाविकास आघाडी एकत्र राहण्यासाठी ठाकरेंच्या शिवसेनेकडून सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. संजय राऊत आणि राहुल गांधी यांची फोनवरून चर्चा झाल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांकडून मिळतेय. मात्र मुंबई काँग्रेस स्वबळावर लढण्यावर ठाम आहे. आता राहुल गांधी ठाकरेंच्या शिवसेनेच्या शब्दाखातर काय पाऊल उचलतात हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

तिकडे ठाकरे बंधूंसोबत येण्यासाठी शरद पवार तयार आहेत, फक्त अट एकच... ती म्हणजे सन्मानजनक जागा मिळण्याची. शरद पवारांच्या राष्ट्रवादीनं मुंबईसाठी ठाकरे बंधूंना 50 जागांचा प्रस्ताव पाठवल्याचं समजतंय. 50 पैकी 30 जागांवर येत्या एक-दोन दिवसात ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी यांच्यात बैठक होणार आहे.

मुंबई महापालिकेत आपली मोट मजबूत असावी यासाठी शेवटच्या क्षणी का होईना, पण ठाकरे बंधूंची धडपड वाढलीय. विरोधकांनी याला नौटंकी म्हणताच संजय राऊतांनी खास त्यांच्या शैलीत पलटवार केला.

### कुठे अडलं, कुठे सुटलं?

- शिवडीतील 3 जागांवर तिढा होता.
- अखेर 2 जागा ठाकरेंची शिवसेना आणि 1 जागा मनसे लढण्यावर एकमत झालं.
- दादरमधील प्रभाग क्रमांक 192 आणि 194 वरून रस्सीखेच सुरू होती.
- अखेर दोघांनी चर्चेअंती हा तिढा देखील सोडवला.
- मात्र, भांडुप आणि विक्रोळीच्या जागेचा तिढा सोमवारी संध्याकाळपर्यंतही सुटलेला नव्हता.

## थोडक्यात...

### पश्चिम रेल्वेवर मोटरमनचा मृत्यू

मुंबई (समर्थ गांवकरी) : पश्चिम रेल्वेवरील विरार रेल्वे स्थानक परिसरात शंटिंग ड्युटी करताना, रूळ ओलांडताना भरधाव एक्स्प्रेसची धडक बसल्याने, मोटरमन दिलीप कुमार साहू यांचा मृत्यू झाला. शनिवारी दुपारी 2.30 वाजता मोटरमन दिलीप कुमार साहू हे विरार येथे कर्तव्य बजावण्यासाठी गेले. ते शंटिंगचे काम करत होते. विरार-डहाणू लोकलचा एक रेक फलाट क्रमांक 4 ए वर आणत होते. रात्री 8 वाजेच्या सुमारास ते रेल्वे रूळ ओलांडताना गाडी क्रमांक 12903 गोल्डन टेम्पल मेलची धडक त्यांना लागली. त्यात त्यांच्या मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पश्चिम रेल्वेचे अधिकारी, पोलीस पोहचले. तसेच मोटरमनचा मृत्यू झाल्याची माहिती लोको पायलट आणि स्थानक व्यवस्थापकांनी पश्चिम रेल्वेच्या संबंधित विभागाला दिली.

### मुंबईच्या किमान तापमानात घट कायम

मुंबई (समर्थ गांवकरी) : मागील काही दिवसांपासून राज्याच्या उत्तेरेकडील भागांसह मध्य भारताकडे येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे राज्यातील किमान तापमानात घट झाली आहे. मुंबईतही अशीच परिस्थिती असून मुंबईतील हवामान केंद्राच्या सांताक्रूझ केंद्रात सोमवारी 15.2 अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदले गेले. रविवारच्या तुलनेने किमान तापमानात 2.2 अंश सेल्सिअसची घट झाली आहे. राज्यातील इतर भागांतील किमान तापमानातही घट झाली आहे. मुंबईतील किमान तापमानात मागील काही दिवसांपासून चढ उतार सुरु असला तरीही येथील किमान तापमान 14 ते 20 अंश सेल्सिअसच्या दरम्यान नोंदले जात आहे.

# जेजुरीत भेसळयुक्त भंडारा विक्रेत्यांवर कारवाई

## अन्न, औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडून टेम्पो जप्त



जेजुरी: (समर्थ गांवकरी)

जेजुरीत खंडोबा गडाच्या पायथ्याशी लागलेल्या भंडाऱ्याच्या आगीच्या दुर्घटनेत दोन नगरसेविकांसह १६ जण जखमी झाल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर अन्न आणि औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी जेजुरीत भेसळयुक्त भंडारा विक्री करणाऱ्यांविरोधात कारवाईची मोहीम सुरू केली. त्यामध्ये भंडाऱ्याची पोती असलेला एक टेम्पो सोमवारी सायंकाळी जप्त केला.

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अन्नसुरक्षा अधिकारी क्रांती बारवकर, रजिया शेख, लक्ष्मीकांत सावळे, डॉ संदीप शिंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली. या कारवाईच्यावेळी जेजुरी पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे उपस्थित होते. पकडण्यात आलेल्या टेम्पोतील भंडाऱ्याचे नमुने पुढील तपासणीसाठी पाठवण्यात येणार असल्याची माहिती अन्नसुरक्षा अधिकारी क्रांती बारवकर यांनी दिली.

नगरपरिषदेच्या निवडणुकीत विजयी झालेले उमेदवार रविवारी खंडोबा गडाच्या पायथ्याशी दर्शनासाठी आले होते. यावेळी औक्षण करताना मोठ्या प्रमाणात उधळलेल्या भंडाऱ्यामुळे आगीचा भडका उडाला. त्यामध्ये २ नगरसेविकांसह १६ जण जखमी झाले. यातील २ जणांना घरी सोडण्यात आले आहे. मात्र, १४ जणांवर उपचार सुरू आहेत. जखमींची प्रकृती सुधारत असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते माउली खोमणे यांनी दिली.

### भेसळयुक्त भंडारा बनवणाऱ्या कंपन्यांचा शोध घ्या

जेजुरीत मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त भंडारा येतो. हा भंडार भाविकांच्या आरोग्याला अपायकारक असून कालची दुर्घटना ही गंभीर आहे. येथे वर्षाकाठी खंडोबाच्या आठ मोठ्या यात्रा भरतात. लाखो लोक जेजुरीत येतात. गडावर भाविक पेटवलेल्या दिवट्या घेऊन तळी भंडारा करीत असतात. त्यामुळे केमिकलयुक्त बनावट भंडारा बनवणाऱ्या कंपन्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर व विक्रेत्यांवर तातडीने कारवाई व्हावी, अशी मागणी श्री मार्तंड देव संस्थानचे मुख्य विश्वस्त मंगेश घोणे यांनी केली आहे.

# बेहिशेबी मालमत्तेच्या आरोपाप्रकरणी ठाकरे कुटुंबीयांना दिलासा



मुंबई : (समर्थ गांवकरी)

राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि त्यांच्या कुटुंबियांनी बेहिशेबी मालमत्ता जमा केल्याचा आरोप करणारी आणि त्याची केंद्रीय तपास यंत्रणांतर्फे चौकशीची मागणी करणारी नवीन याचिका सुनावणीयोग्य नसल्याचे उच्च न्यायालयाने सोमवारी स्पष्ट केले. तसेच, ही याचिका ऐकण्यास नकार दिला. त्याचवेळी, याचिकाकर्त्यांनी कायदेशीर सल्लागाराची मदत घ्यावी, अशी सूचनाही न्यायालयाने दिली. सारख्याच मागणीसाठी याचिकाकर्ते अभय भिडे यांनी दाखल केलेली याचिका याआधीच म्हणजे तीन वर्षांपूर्वी फेटाळण्यात आली आहे. त्यामुळे त्याच मुद्यावर नव्याने याचिका करण्यामागे काहीच अर्थ नसल्याचे निरीक्षण न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती रणजित भोसले यांच्या खंडपीठाने नोंदवले. तसेच याचिका सुनावणीयोग्य नाही, असे स्पष्ट करून याचिकाकर्त्यांना कायदेशीर सल्ला घेण्याची सूचना केली. तत्पूर्वी, उद्धव ठाकरे आणि त्यांच्या कुटुंबियांविरोधात बेहिशबा मालमत्ता जमवल्याचा आरोप करणारी जनहित याचिका आपण आणि आपल्या मुलीने केली होती.

# धुक्यामुळे अनेक विमानांना विलंब

नागपूर : (समर्थ गांवकरी)



संपूर्ण देशात थंडीचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत असून त्यासोबतच दाट धुके, कडाक्याची थंडी आणि कमी दृश्यमानतेची समस्या निर्माण झाली आहे. याचा थेट परिणाम हवाई वाहतुकीवर होत असून नागपूर विमानतळावर येणाऱ्या व जाणाऱ्या अनेक विमानांना विलंबाचा सामना करावा लागत आहे. सोमवारीही ही परिस्थिती कायम राहिली. धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव अनेक विमानांच्या आगमन आणि प्रस्थान वेळेत बदल करण्यात आला. दिल्लीहून नागपूरला येणारी एक विमानसेवा सुमारे अर्धा तास उशिराने पोहोचली, तर दुसरी दिल्ली–नागपूर विमानसेवा तब्बल एक तास विलंबाने दाखल झाली. याशिवाय बंगळुरू–नागपूर विमान ४० मिनिटे, तर पुणे–नागपूर विमान १५ मिनिटे उशिराने नागपूर विमानतळावर उतरले. नागपूरहून इतर शहरांकडे जाणाऱ्या विमानसेवांनाही धुक्याचा फटका बसला. नागपूर–बंगळुरू विमान सुमारे एक तास २० मिनिटे उशिराने रवाना झाले. त्याचप्रमाणे नागपूर–मुंबई विमानाला ५० मिनिटांचा विलंब झाला, तर नागपूर–पुणे विमान ४१ मिनिटे उशिराने उड्डाण घेऊ शकले. या विलंबामुळे प्रवाशांची गैरसोय झाली असून अनेकांना पुढील प्रवासाच्या जोडण्या चुकण्याची भीती होती. काही प्रवाशांना विमानतळावर बराच वेळ थांबावे लागले. हवामान विभागाने पुढील काही दिवस सकाळच्या वेळेत धुक्याची स्थिती कायम राहण्याचा अंदाज वर्तवला असून, त्यामुळे हवाई प्रवासात आणखी अडथळे येण्याची शक्यता आहे. विमान कंपन्यांकडून प्रवाशांना वेळापत्रकाबाबत सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# लवासा प्रकरणी सीबीआय चौकशीची मागणी उच्च न्यायालयाने फेटाळली

## शरद पवार, अजित पवार, सुप्रिया सुळे यांना दिलासा



मुंबई : (समर्थ गांवकरी)

पुण्यातील लवासा प्रकल्पाप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे यांच्याविरुद्ध सीबीआय चौकशीची मागणी करणारी फौजदारी जनहित याचिका उच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळली. मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या याचिकेवरील निर्णय गेल्या आठवड्यात राखून ठेवला होता. त्याचवेळी याचिकाकर्त्यांची मागणी मान्य करण्याबाबत आपण अनुकूल नसून याचिका फेटाळण्याकडे आपला कल असल्याचे न्यायालयाने प्रामुख्याने स्पष्ट केले होते. या याचिकेवर सोमवारी निर्णय देताना ती फेटाळण्यात येत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाच्या सविस्तर आदेशाची प्रत नंतर उपलब्ध होईल. दरम्यान, याचिकेतील मागणीबाबत दिवाणी अधिकारक्षेत्राचा वापर करून पोलिसांना फौजदारी प्रक्रिया संहितेतंर्गत (सीआरपीसी) प्राथमिक माहिती अहवाल (एफआयआर) दाखल करण्याचे आदेश न्यायालय देऊ शकते हे दाखवणारी कोणतीही कायदेशीर तरतूद दाखवून देण्यात याचिकाकर्ते अपयशी ठरले आहेत. शिवाय, यापूर्वी दिवाणी स्वरुपाची जनहित याचिका निकाली काढताना संबंधित खंडपीठाने नोंदवलेल्या निरीक्षणांच्या आधारे गुन्हा दाखल करण्याचे आदेश देता येणार नाहीत, असेही मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने याचिकेवरील निर्णय राखून ठेवताना स्पष्ट केले होते. तत्पूर्वी, या निकालाच्या निष्कर्षाचा आधार देऊन प्रकल्पाला दिलेल्या बेकायदेशीर परवानग्यांबद्दल शरद पवार, सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश सीबीआयला देण्याची मागणी नाशिकस्थित याचिकाकर्त्यांनी युक्तिवाद करताना केली होती.

### यापूर्वीही दिलासा नाही

लवासा हिलस्टेशन प्रकल्पाबाबत याचिकाकर्त्यांनी केलेले आरोप तत्वतः खरे असले तरीही त्याला आव्हान देण्यास बराच विलंब झाल्याचे निरीक्षण तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने २६ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रकल्पाविरोधातील याचिका निकाली काढताना नोंदवले होते. याचिकेत केलेले आरोप योग्य असले तरीही कायद्यात केलेले बदलही बेकायदेशीर असल्याचे म्हणता येणार नाही. याचिकाकर्त्यांच्या आरोपानुसार, शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांना लवासा प्रकल्पात स्वारस्य होते हे स्पष्ट दिसते. तसेच या प्रकल्पासाठी रितसर निविदा प्रक्रिया राबवणे आवश्यक होते. तसे न केल्याचे अधोरेखित होत असल्याचे निरीक्षणही खंडीपठाने निकालात नोंदवले होते.

# भारतात भाजपाकडून लोकशाहीवर हल्ला

## तपास यंत्रणांचा दुरुपयोग : राहुल गांधी



मुंबई : (समर्थ गांवकरी)

काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे सध्या जर्मनीच्या दौऱ्यावर आहे. जर्मनीतल्या बर्लिन या ठिकाणी त्यांनी भाषण केलं आणि मुलाखतही दिली. राहुल गांधींनी यावेळी भाजपावर जोरदार टीका केली. भारतात लोकशाहीवर हल्ला होतो आहे. हरियाणा या राज्यात आम्ही जिंकणार होतो. पण निवडणूक व्यवस्थेत समस्या निर्माण करण्यात आली आणि आमचा पराभव झाला. राहुल गांधींच्या भाषणाचा हा व्हिडीओ काँग्रेसने पोस्ट केला आहे. राहुल गांधी पुढे म्हणाले, "तेलंगणा, हिमाचल प्रदेश या ठिकाणी आम्ही जिंकलो. निवडणूक प्रक्रियेत आम्ही पारदर्शकतेचा मुद्दा सातत्याने उपस्थित करत आहोत. पण हरियाणा आणि महाराष्ट्र या दोन्ही ठिकाणी निवडणूक पारदर्शक पद्धतीने घेण्यात आली नाही. भारतातील मोठ्या सार्वजनिक संस्थांवरचा हा हल्ला आहे. मी घेतलेली पत्रकार परिषद तुम्ही पाहिली असेलच. ब्राझीलच्या महिलेने हरियाणात मतदान केलंय. हरियाणाच्या मतदार यादीत तिचं नाव २२ वेळा आहे. एका महिलेने एका बूथवर २०० वेळा मतदान केलं. याबाबत आम्ही प्रश्न उपस्थित केले की निवडणूक आयोग उत्तर देत नाही. निवडणूक आयोगाच्या पायाभूत व्यवस्थेत बिघाड करण्यात आला आहे हे आमचं प्रामाणिक मत आहे." राहुल गांधी पुढे म्हणाले, आमच्या देशातल्या सार्वजनिक संस्थांवर सातत्याने हल्ला होतो आहे. आमचा गुप्तचर विभाग, सीबीआय, ईडी यांचा वापर विरोधकांच्या विरोधात हत्यारांप्रमाणे केला जातो आहे. सीबीआय आणि ईडी यांच्याकडून करण्यात आलेल्या केसेस या भाजपाला विरोध करणाऱ्यांवरच आहे.

# प्रसिद्ध दिग्दर्शिका सई परांजपे यांना पुरस्कार



मुंबई : (समर्थ गांवकरी)

आशियाई चित्रपट महोत्सवाच्या माध्यमातून गेली दोन दशकांहून अधिक काळ मुंबईकरांना आशियाई देशांमधील उत्तमोत्तम चित्रपट पाहण्याची संधी देणाऱ्या २२ व्या थर्ड आय चित्रपट महोत्सवाची घोषणा सोमवारी करण्यात आली. ९ जानेवारी ते १५ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सवात यंदा प्रसिध्द लेखिका-दिग्दर्शिका पद्मभूषण सई परांजपे यांना 'आशियाई चित्रपट संस्कृती पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तर ख्यातनाम लेखिका, कास्टिंग डिरेक्टर उमा दा कुन्हा यांना 'सत्यजित रे स्मृती पुरस्कार' देऊन गौरवण्यात येणार आहे. आशियाई चित्रपटांबरोबरच विविध भारतीय भाषांमधील चित्रपट पाहण्याची संधी देणाऱ्या 'थर्ड आय' आशियाई चित्रपट महोत्सवाचे आयोजन ९ जानेवारी ते १५ जानेवारी दरम्यान करण्यात आले आहे. यंदा महोत्सवात एकूण ५६ चित्रपटांची निवड करण्यात आली असून हे चित्रपट प्रभादेवीतील पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीचे मिनी थिएटर आणि ठाण्यातील लेक शोर मॉलमधील सिनेपोलीस चित्रपटगृहात दाखवले जाणार आहेत, अशी माहिती महोत्सवाचे संचालक संतोष पाठारे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली. या महोत्सवाचे उद्घाटन बुसान चित्रपट महोत्सवात फ्रीप्रेस्की परीक्षक पुरस्कार पटकावलेल्या 'ऑन युवर लॅप' (पांगकू) या इंडोनेशियन चित्रपटाने होणार आहे. तसेच, महोत्सवातील महत्वाच्या पुरस्कारांबरोबरच दिवंगत चित्रपट अभ्यासक, समीक्षक यांच्या स्मृतीप्रित्यर्थ देण्यात येणारा चित्रपट लेखनाचा विशेष पुरस्कार चित्रपट अभ्यासक मिनाक्षी शेट्टे यांना देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी आशियाई चित्रपट फाऊंडेशनचे अध्यक्ष किरण व्ही. शांताराम आणि लेखक, गीतकार, दिग्दर्शक क्षितिज पटवर्धन उपस्थित होते.

## संवाद व संघर्ष दोन्ही मार्गाने प्रयत्न करण्यावर एकमत

- नासिक पुणे हायस्पीड रेल्वे अकोले स्टेशनसह पूर्वीच्या मार्गाने जावी यासाठी सहविचार सभा संपन्न.
- मुख्यमंत्र्यांनी चर्चेचा प्रस्ताव स्वीकारला



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

नाशिक-पुणे रेल्वे अकोले स्टेशन सह पूर्वीच्याच मार्गाने गेली पाहिजे या मागणीसाठी या मार्गावरील सर्व आमदार, खासदार, लोकप्रतिनिधी, सर्व पक्षांचे प्रमुख नेते व कार्यकर्ते तसेच संबंधित तालुक्यांमध्ये कार्यरत असलेल्या रेल्वे कृती समितीचे कार्यकर्ते यांची सहविचार सभा नांदूर खांदरमाळ फाटा संगमनेर येथे संपन्न झाली. अकोले तालुक्यातील हजारो नागरिकांनी आपल्या या मागणीसाठी नुकताच अकोले ते संगमनेर भव्य मोर्चा काढला होता. 22 किलोमीटरचे अंतर पार करत संगमनेर प्रांत कार्यालयावर धडकलेल्या या मोर्चामध्ये संबंधित सर्व आमदार खासदारांनी एकत्र बैठक करून या आंदोलनाचे नेतृत्व करावे असे आवाहन अकोले करांनी केले होते. आ. सत्यजित तांबे यांनी या आवाहनानुसार पुढाकार घेतला. डॉक्टर अजित नवले यांनीही सर्व आमदार खासदार व परिसरातील नेतृत्वांना संपर्क करून एकजूट करण्याचा प्रयत्न केला. अजय फटांगरे यांनी या कामी मेहनत घेतली.

संवाद व संघर्ष या दोन्ही मार्गाने प्रयत्न करून आपली मागणी मान्य करून घेण्यावर यावेळी सर्व लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांचे एकमत झाले.

आंदोलनाचा पहिला टप्पा म्हणून सर्व प्रतिनिधी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांची भेट घेऊन भूमिका मांडली जाणार असून यासाठी आजच्या बैठकीतूनच आ. सत्यजित तांबे यांनी मुख्यमंत्री महोदयांसोबत फोनवरून चर्चा केली. त्यांनी रेल्वे कृती समितीच्या शिष्टमंडळाला जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात भेटीसाठी वेळ देण्याबाबत आश्वस्त केले.

आ. सत्यजित तांबे, डॉ. अमोल कोल्हे, खा. राजाभाऊ वाजे, खा. भाऊसाहेब वाकचौरे, मा.खा. शिवाजीराव आढळराव पाटील, मा.खा. सदाशिवराव लोखंडे, आ. शरद सोनवणे, आ. किरण लहामटे, आ. बाबाजी काळे, आ. अतुल बेनके, श्री. देवदत्त निकम, श्री. सत्यशील शेरकर, सौ. नीलम अमोल खताळ, उत्कर्षा रूपवते, उदय सांगळे, कॉ. अजित नवले, कॉ. कारभारी उगले, बाजीराव दराडे, महेश नवले, गणेश ताजने, मच्छिंद्र धुमाळ, प्रदीप हासे, डॉ. संदीप कडलग, विनय सावंत, जालिंदर वाकचौरे, अमोल वाघमारे, प्रमोद मंडलिक, वसंत बाळसराफ, कपिल पवार, दत्ता ढगे हरिभाऊ तांबे, यांच्यासह इतरही मान्यवर उपस्थित होते. प्रमुख मान्यवरांनी आपले अनुभव मांडत लढ्याची पुढील दिशा कशी असावी याबाबत मार्गदर्शन केले.

संवादाने प्रश्न मिटेल अशी आशा यावेळी सर्व आमदार खासदार व लोकप्रतिनिधींनी व्यक्त केली. मात्र तसे झाले नाही तर नाशिक, सिन्नर, अकोले, संगमनेर, जुन्नर, आंबेगाव, राजगुरुनगर या सर्व परिसरामध्ये व्यापक जनजागृती करून भव्य लढा उभारण्याचे यावेळी जाहीर करण्यात आले. सिन्नर ते राजगुरुनगर असा भव्य वेहिकल मार्च काढून आंदोलनाची तयारी करण्याबाबत यावेळी प्रस्ताव मांडण्यात आला. सरकारने जनभावना लक्षात न घेतल्यास चाकण किंवा आळेफाटा या ठिकाणी बेमुदत चक्काजाम आंदोलन करून हा प्रश्न केंद्रस्थानी आणण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

## वैजापुर नगर परिषदेवर डॉ दिनेश परदेशीचे वर्चस्व

**वैजापूर : (समर्थ गांवकरी)**



वैजापुर नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे . डॉ. दिनेश परदेशी यांनी शिवसेना (शिंदेगट) पक्षाचे उमेदवार संजय बोरनारे यांचा पराभव करत थेट जनतेतुन निवडून येऊन नगर परिषदेवर आपले वर्चस्व सिध्द केले आहे. विधानसभा निवडनुकीच्या वेळी एकमेकांविरोधात निवडणूक लढविलेले आ. प्रा. रमेश बोरनारे आणि डॉ. दिनेश परदेशी यांच्यातील राजकिय वर्तुळ भोवती नगरपरिषद नियंडबुकीची श्रृंखला निर्माण झाली असल्याने ही निवडणूक जितकी प्रतिष्ठेची तितकीच चुरशीची मानली गेली होती. यामध्ये आ.प्रा. रमेश बोरनारे यांचे बंधू संजय बोरनारे हे शिवसेना पक्षाकडून नगराध्यक्षपदाचे अधिकृत उमेद्वार होते तर भारतीय जनता पार्टीच्या वतीने डॉ. दिनेश परदेशी हे नगराध्यक्षपदासाठी निवडणूक रिंगणात होते. प्रचारावेळी अनेक आरोप प्रत्यारोप झाले परदेशी यांनी विधान सभा निवडणूकीच्या पराजयाने खचून न जाता नव्याने सुरुवात केल्याने त्यांची नगरपरिषदेवरीत पकड अधिक मजबूत झाली होती. परिणामी या निवाणुकीत डॉ. दिनेश परदेशी यांनी आ.प्रा. रमेश बोरनारे यांचे बंधू संजय बोरनारे यांचा ६ हजार २४८ मतांच्या फरकाने पराभव केला आणि पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले भाजपने १९ पैकी ११ जागा जिंकल्या तर राष्ट्रवादीने ६ पैकी ४ जागा जिंकल्या. भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी पुरस्कृत एकूण २५ पैकी १५ उमेदवार विजयी झाले त्यामुळे नगरपरिषदेवर बहुमत सिद्ध केले तर दुसरीकडे आ. प्रा .रमेश बोरनारे यांच्या नेतृत्वाखाली. शिवसेना (शिंदेगट) पक्षाचे १० उमेदवार विजयी झाले आहेत या निवडणूकीत एकमेकांविरोधात अनेक आरोप-प्रत्यारोप केले परंतु सुज्ञ मतदारांनी आरोप-प्रत्यारोपांकडे दुर्लक्ष करत विकासात्मक कार्याला महत्व दिले गेल्याचे जानकार चर्चा करत आहेत भाजपा सोबत आघाडी करून राष्ट्रवादीनेही आपले वर्चस्व वाढविले आहे.

## क्रीडा महोत्सवातून कलागुणांना वाव मिळतो : डॉ. पाटील




**भिवंडी: (समर्थ गांवकरी)**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका शाळा क्रमांक ४५ यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही 'उत्साह क्रीडा महोत्सव – २०२५' या नावाने विविध क्रीडास्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन स्वराज तोरणचे संपादक डॉ. किशोर बळीराम पाटील यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडले. उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. किशोर पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, क्रीडा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो. खेळाच्या माध्यमातून विद्यार्थी आपल्या शाळेचे, शहराचे व परिणामी देशाचे नाव उज्वल करू शकतात. आज विविध प्रकारचे खेळ उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी कबड्डी, खो-खो, लंगडी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, क्रिकेट, कुस्ती आदी कोणत्याही खेळात प्राविण्य मिळवावे, असे आवाहन त्यांनी केले.

या उद्घाटन सोहळ्यास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. विजय जोशी, उपाध्यक्ष श्री. निवृत्ती ऐनकर, सदस्य श्री. प्रदीप पाटील, सौ. भक्ती जोशी, श्री. तुकाराम वाघ, श्रीकांत भोईर, गणराज सापटे, अंकुश केदारी यांच्यासह नाट्यकलाकार श्री. गणेश वाघमारे, अनिकेत घोगरे, अनिरुद्ध (सह्याद्री अकॅडमी) आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक श्री. गणेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सदानंद म्हात्रे, श्री. संतोष कसार, श्री. राहुल हिंदराव, श्री. किरण काकडे, श्री. बाळू वाघ, सौ. स्वाती भोईर, लीना चौधरी, अनिता कसार, सुरेखा लांबोळे, लीना माळी, वंदना सोनवणे, मनस्वी पाटील, कांचन निकम, स्मिता वेखंडे, कांता बांगारे, ऋतुजा जाधव, शर्मिला म्हात्रे आदी शिक्षकांनी क्रीडा महोत्सवाचे उत्कृष्ट नियोजन व आयोजन केले आहे.



## सौ संगिता माहाजन विजयी

**रावेर : (समर्थ गांवकरी)**

रावेर नगरपालिका निवडनुकीत भाजपाच्या सौ .संगिता भास्कर माहाजन , या भरघोस मतांनी विजयी झाल्या आहेत. त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवार सौ मनिषा रविंद्र पवार यांचा पराभव करून विजय मिळवला आहे. पालिकेच्या २४ जागांसाठी निवडणूक घेण्यात आली होती .या आधी नगरसेवक पदाची १ जागा बिनविरोध झाल्याने 23 जागांसाठी निवडनुक घेण्यात आली होती.

## विकासाच्या कामांचा झंझावात : वाळकी गटाची स्वतंत्र ओळख

- विकास कामांच्या जोरावर वाळकी गट 'एक नंबर'
- खासदार नीलेश लंके यांची तुफान फटकेबाजी

**आहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




जिल्हा परिषद वाळकी गटामध्ये मोठ्या प्रमाणात विकास कामे मार्गी लावत गटाची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यात आली असून, विकासाच्या जोरावर हा गट 'एक नंबर' ठरला आहे, असे प्रतिपादन खासदार नीलेश लंके यांनी केले. वडगाव तांदळी येथे ५२ लाख रुपये खर्चातून उभारण्यात आलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या नवीन खोल्या व अंगणवाडी इमारतींच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी खासदार लंके बोलत होते. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने ग्रामस्थ व पदाधिकारी उपस्थित होते.

खासदार लंके म्हणाले, ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था सक्षम करण्यासाठी शाळांच्या भौतिक सुविधा वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. दर्जेदार शिक्षणासाठी शासन स्तरावरून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

वाळकी गटामध्ये रस्ते, पाणीपुरवठा, शाळा खोल्या, समाजमंदिरे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, नदी खोलीकरण, अंगणवाडी व आरोग्य सुविधा यांसारखी अनेक विकास कामे बाळासाहेब हराळ यांच्या पुढाकारातून मार्गी लागली आहेत. या कामांमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मोठी मदत होत असल्याचे लंके यांनी नमूद केले.

यावेळी बाळासाहेब हराळ म्हणाले, वाळकी गटात महाविकास आघाडीच्या माध्यमातून मंजूर झालेल्या कामांचे उद्घाटन विरोधक करत असून, दुसऱ्याच्या कामाचे श्रेय लाटण्याचा हा डाव नागरिकांनी ओळखला आहे. जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्याचे काम विरोधक करत आहेत. शिक्षण, आरोग्य व मूलभूत सुविधा या क्षेत्रात प्राधान्य देत गटाचा सर्वांगीण विकास साधण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

प्रताप शेळके म्हणाले, जिल्हा परिषद उपाध्यक्ष असताना जिल्ह्यातील शाळा खोल्या मंजूर करण्यात आल्या. विकासाचा ठोस मुद्दा नसल्यामुळे विरोधक दुसऱ्याच्या कामाचे श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत, अशी टीकाही त्यांनी केली.

## ८५ कढया आमटी आणि २१ लाखांचा मसाला

- श्रीरंगदास स्वामी महाराज यात्रोत्सव
- उत्साहात लाखो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



जुन्नर तालुक्यातील आणे येथे श्रीरंगदास स्वामी महाराजांच्या पुण्यतिथीचा सोहळा १३ ते २१ डिसेंबर या कालावधीत मोठ्या उत्साहात पार पडला. गेल्या १३७ वर्षांपासून अव्याहत सुरू असलेल्या या यात्रेचे मुख्य आकर्षण ठरलेला महाप्रसाद यंदा विक्रमी स्वरूपाचा ठरला. यासाठी ८५ कढई आमटी तयार करण्यात आली, ज्यात केवळ मसाल्यांवरच २१ लाख २५ हजार रुपये खर्च झाला, अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष मधुकर दाते यांनी दिली. जगभरात प्रसिद्ध असलेली आमटी-भाकरीची चव चाखण्यासाठी लाखो भाविकांनी हजेरी लावली. हरिनाम सप्ताहात लाखो भक्त सहभागी झाले. शनिवार-रविवारी महाप्रसादासाठी आसपासच्या गावांतून हजारो किलो भाकऱ्या वाजत-गाजत आणल्या गेल्या. विशेष म्हणजे, आमटी एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर नेण्यासाठी विद्युत पंपाचा वापर करण्यात आला, तर घरी नेण्यासाठी स्वतंत्र वितरण व्यवस्था होती. एका कढईत ५०० लिटर आमटी तयार होते. त्यासाठी खोबरे १० किलो, शेंगदाणे १०, गूळ १०, मिरची २, हळद ०.५, धने पावडर ५, आमसुल २, गरम मसाला ४, हिंग ०.५, जिरे ०.५, मोहरी ०.५, बेसन ५, तूरडाळ २०, तेल १५ लिटर आणि मीठ ६ किलो असे मसाले वापरले जातात. वाराणसीहून आलेल्या रंगदास स्वामींनी येथे तीन तपे केली आणि पिंपळाखाली समाधी घेतली. तेव्हापासून हा यात्रोत्सव सुरू आहे. वाढत्या गर्दीमुळे ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून दोन कोटी रुपये खर्च करून १२ हजार चौरस फूटाचा भव्य दोन मजली हॉल उभारला असून, एका पंगतीत ३ ते ४ हजार भाविकांना प्रसाद दिला जातो. '१ ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळालेल्या या देवस्थानची प्रगती भाविकांच्या श्रद्धेचे प्रतीक आहे.

> श्री रंगदास स्वामी यांच्या उत्सव सोहळ्यामध्ये मोठ्या संख्येने पंचक्रोशीतून भाविक भक्त येत असतात दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा भाविकांची प्रचंड गर्दी होती भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून आणे ग्रामस्थांच्या वतीने नियोजन करण्यात आले होते. आमटीचा महाप्रसाद प्रसिद्ध आहे.
>
> **- डॉ. दीपक आहेर (आणे)**

## नगराध्यक्ष कॉंग्रेस, तर बहुमत राष्ट्रवादीकडे

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

नगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये मतदारांनी मतदान करून पुन्हा एकदा धक्कादायक निकाल दिला आहे. गेल्या निवडणूकित २०१५ - १६ च्या निकाल धक्कादायक होता कॉंगेसचे नगराध्यक्ष निवडून दिले होते तर शिवसेनेचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर नगरपालिकेमध्ये बहुमत शिवसेनेला दिला होता तर कॉंग्रेसचे नगराध्यक्ष विजय झाले होते धक्कादायक निकालामुळे शहराचा विकास झालात नव्हता तरीपण शहराच्या जनतेने पुन्हा एकदा धक्कादायक निकाल दिला असल्याचे चित्र पाहायला मिळाले आहे. २०२५ ची निवडणूक निर्णय असेल व एक हाती सत्ता एकाच पक्षाला मिळाला अशीही चर्चा शहरामध्ये होत होती.

## वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

भाळवणी येथील वैभव दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा तथा शिवसेना नेते उद्योजक संदीप रोहोकले यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. यावेळी शालेय विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. हे वाटप शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते कार्यक्रम पार पडला.

संदीप रोहोकले यांचा वाढदिवस दरवर्षी विविध सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा केला जातो. भाळवणी गाव व परिसरात त्यांचे नेहमीच उल्लेखनीय सामाजिक योगदान राहिले आहे. वाढदिवसानिमित्त राबवलेले हे उपक्रम समाजाला प्रेरणा देणारे असतात. शिक्षण क्षेत्रातील हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी मार्गदर्शक ठरेल, असे मत व्यक्त होत आहे.

संदीप रोहकले हे भाळवणी पंचायत समिती गणातील सर्व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना टिफिन बॅगचे वाटप करणार आहेत.

कार्यक्रमास संदीपशेठ कपाळे, अरुण रोहोकले, प्रकाश आमले, बाळासाहेब रोहोकले, साहेबराव खरमाळे, आरती चेमटे, शिवनाथ लोंढे, पवन रोहोकले, सचिन रोहोकले, नवनाथ रोहोकले, राजू जाधव, विकास रोहोकले, विलास साठे सर, मारुती रोहोकले, मुख्याध्यापक श्रीपती आबुज सर, बबन मते, दत्तात्रय सिनारे, सयाजी दरेकर, छाया रोहोकले, उज्ज्वला शिंदे, राजश्री पंधारे आदी मान्यवर उपस्थित होते.

> संदीप रोहोकले हे नेहमीच सामाजिक कार्यात आघाडीवर असतात. त्यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप हा एक स्तुत्य उपक्रम आहे. शिक्षण हेच समाजाच्या प्रगतीचे मूळ आहे. असे उपक्रम विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतात आणि समाजाला दिशा देतात.
>
> **- सुजित झावरे पाटील (माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद)**

## तमाशा फडाच्या सादरीकरणातून पारंपरिक संस्कृतीचे दर्शन

**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**



श्रीक्षेत्र माळेगावची यात्रा ही राज्यातील आगळी वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण यात्रा म्हणून ओळखली जाते. लोकनाट्य तमाशा, पारंपरिक लावणी आणि महाराष्ट्राची समृद्ध लोकधारा यांचे जिवंत दर्शन माळेगाव यात्रेत अनुभवायला मिळते. यावर्षी माळेगाव यात्रेत एकूण सात नामांकित लोकनाट्य मंडळ दाखल झाले असून ग्रामीण भागातील लोकसंस्कृतीचा ठेवा येथे खुलून दिसत आहे. तमाशा, लोकनाट्य, गणगवळण, बतावणी, मुजरा, फड, ढोलकीची जुगलबंदी आणि पारंपरिक लावण्या अशा विविध कलाप्रकारांचे सादरीकरण या फडांमधून होत आहे. कलावंतांनी लिहिलेल्या सामाजिक व धार्मिक आशयाच्या वगांमधून समाजप्रबोधना सोबतच मनोरंजनाचीही प्रभावी सांगड घातली जात आहे. या फडातून माळेगाव यात्रेत लोककलेची मुक्त उधळण पाहावयास मिळत आहे. प्रत्येक फडामध्ये एकाहून एक सरस व अनुभवी कलावंत सहभागी असून प्रेक्षकांची मोठी गर्दी होत आहे. रघुवीर खेडकर सह कांताबाई सातारकर, रुपाली पुणेकर, तुकाराम खेडकर सह पांडुरंग मुळे, आश्विनी-शिवाणी बोरगावकर, सविताराणी पुणेकर,आनंद लोकनाट्य आणि शिवकन्या बडे हे सात लोकनाट्य मंडळ माळेगावात आले आहेत.

## श्रीमद् भागवत सप्ताहाचा भक्तिमय समारोप

**"शेवट कथेचा आहे, पण जीवनातील भगवंताची सुरुवात आजपासून"**

**मुलुंड : (समर्थ गांवकरी)**



ठक्कर धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठाणावाला ट्रस्ट आणि महालक्ष्मी महिला सेवा ग्रुप यांच्या वतीने पितृमोक्षमार्गावरील श्रीमद् भागवत सप्ताहाच्या समापन सोहळ्याचे आयोजन मुलुंड येथील क्रिस्टल हॉलमध्ये भक्तिमय वातावरणात पार पडले. सप्ताहाच्या समारोपप्रसंगी संपूर्ण सभागृह भक्तिरसात न्हाऊन निघाले होते.

या कार्यक्रमाला समाजरत्न नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला हे परिवारासह सौ. अमिता परेश ठक्कर, सौ. किम जितेंद्र ठक्कर यांची प्रमुख उपस्थिती होती. सुप्रसिद्ध कथाकार जिग्रेशभाई जयेशभाई जोशी, विशेष अतिथी दिनेशभाई हिम्मतभाई ठक्कर (मालाड), हरेशभाई मीराणी, सुरेशभाई ठक्कर, माळशेज पतपेढीचे अध्यक्ष ह.भ.प.चंद्रकांत महाराज डुंबरे, नाना महाराज देशमुख, सौ. नीताबेन जोशी, महालक्ष्मी महिला मंडळाच्या भगिनी, गायनकलाकार मयुरी सोनी, राजेंद्र पुराणिक, राजेंद्र पांडे तसेच हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नानजीभाई ठक्कर म्हणाले, "भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णांच्या लीला, भक्तांचे आदर्श आणि जीवन पवित्र करणाऱ्या शिकवणी आहेत. ठाकोरजींसमोर अर्पण केलेले छप्पन नैवेद्य सर्व भाविकांच्या भक्तीने पवित्र झाले आहेत. देवाला तुळशीचा एक कोंबही भक्तीने अर्पण केला तर तो स्वीकारला जातो; छप्पन नैवेद्य अर्पण करणे हे आपले भाग्य आहे."

ते पुढे म्हणाले, "शिक्षण हे जीवनातील सर्वात मोठे शस्त्र आहे. समाजासाठी उपयुक्त कसे राहायचे हे शिक्षण शिकवते. शिक्षणाचा प्रभाव वाढला तर भविष्याचा प्रकाश वाढेल. 'सुशिक्षित भारत हा समृद्ध भारत आहे'—हा विचार आपण आचरणात आणला पाहिजे."

कथाकार जिग्रेशभाई जयेशभाई जोशी यांनी भाविकांना मार्गदर्शन करताना सांगितले, "आज शेवट कथेचा आहे; पण देवाची सुरुवात आता आपल्या आयुष्यात होणार आहे. घरगुती जीवन, व्यवसाय, नातेसंबंध—सर्वत्र कृष्णभावना ठेवणे हीच खरी भागवत आराधना आहे. भगवान श्रीकृष्ण सर्वांच्या जीवनात शांती, आनंद, समृद्धी आणि भक्तीचा वर्षाव करो."

यावेळी चंद्रकांत महाराज डुंबरे म्हणाले, "जीवनात भक्ती असेल तर सर्वकाही सोपे होते. शुद्ध अंतःकरणाने केलेली भक्ती प्रत्येक कृतीला वरदान बनवते. सत्संग, चांगला सहवास आणि सद्गुणी लोकांचा संपर्क मिळाल्यावरच जीवन सुंदर होते."

> यजमान समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला व त्यांच्या कुटुंबीयांनी संपूर्ण सप्ताहात पूजा, आरती आणि दैनंदिन विधी भक्तिभावाने पार पाडले. समारोपाच्या दिवशी सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भक्ती, ज्ञान आणि समाजप्रबोधनाचा संदेश देत श्रीमद् भागवत सप्ताहाचा हा सोहळा अत्यंत प्रेरणादायी ठरला.

# डोहोळे ग्रामपंचायतीच्यावतीने वनराई बंधारा

**ठाणे: (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करत जलसंधारण व ग्रामविकासाच्या दिशेने डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. अभियानांतर्गत ग्रामपंचायत हद्दीत दोन वनराई बंधारे बांधून ग्रामपंचायतीने जलस्रोत संवर्धन व भूजल पातळी वाढीसाठी मोलाचे काम हाती घेतले आहे.




राज्यातील ग्रामविकासाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी व जलसंधारणाबाबत शाश्वत उपाययोजना उभारण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाभरातील ग्रामपंचायतींना लोकसहभागातून मोठ्या प्रमाणावर वनराई बंधारे उभारण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतने जलप्रकल्पाच्या उभारणीसाठी पुढाकार घेतला. ग्रामपंचायतीचे पंचायत अधिकारी परेश सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये सरपंच, सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी सेविका, ग्रामस्तरीय आरोग्य कर्मचारी तसेच स्थानिक ग्रामस्थ यांनी उत्साहात श्रमदान करत सहभाग नोंदवला. सर्वांच्या सहकार्यातून बंधाऱ्यांचे काम नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण झाले.

सदर बंधाऱ्यांमुळे परिसरातील जलस्रोत स्थिर राहण्यास मदत होणार असून, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच आगामी पावसाळ्यात जलसाठा वाढीस लागल्यास स्थानिक शेती व भूजल पातळी सुधारेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

ग्रामपंचायत विकास, पाणी संवर्धन आणि लोकसहभाग या त्रिसूत्रीवर आधारित अशा उपक्रमांमुळे गावांच्या प्रगतीचा मार्ग अधिक मजबूत होईल, असे ग्रामविकास तज्ज्ञांचे मत आहे. डोहोळे ग्रामपंचायतीचा हा जलसंधारण उपक्रम तालुक्यात आदर्श ठरत आहे.




ठाणे : दिव्यातील खेड तालुका कोकण रहिवासी मंच आयोजित आठवा दिनदर्शिका २०२६ प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. दिवा शहरातील बी आर म्हात्रे नगर येथील जनसंपर्क कार्यालयात अध्यक्ष सतीश निकम, सचिव निलेश पाटणे, खजिनदार संदेश कदम व इतर पदाधिकाऱ्यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत व आभार मानले. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### जिल्हास्तरीय स्पर्धेत विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाचे घवघवीत यश

**श्रीगोंदा (स. गांवकरी) : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य (पुणे) तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर येथील वाळकी येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय थाय बॉक्सिंग स्पर्धा २०२५ मध्ये श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी नेत्रदीपक कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे. या यशामुळे विद्यालयाने विभागीय स्तरावर आपले स्थान निश्चित केले आहे. सुवर्णपदक प्राप्त केलेल्या पाच विद्यार्थिनींची पुणे विभागीय शालेय थाय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशस्वी विद्यार्थिनींना विभागप्रमुख श्री. किरण कोकणी तसेच श्री. ओम पांढरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा भोईटे, उपमुख्याध्यापिका सौ. नीलिमा कातोरे, पर्यवेक्षक श्री. बाळासाहेब शिंदे आणि गुरुकुलप्रमुख श्री. किरण शिंदे यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या यशस्वी कामगिरीबद्दल विद्यार्थिनींचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.**




### याझाकी इंडिया कंपनीमध्ये अभियांत्रिकी शाखेच्या २३ विद्यार्थ्यांची निवड

**बेल्हे (स. गांवकरी) : समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट,बेल्हे या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये याझाकी इंडिया प्रा.लि.यांच्या वतीने अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाअंतर्गत "ऑनलाईन कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह-२०२५" चे नुकतेच आयोजन करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे यांनी दिली. या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये इलेक्ट्रिकल,इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग मधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. याझाकी कंपनीच्या एच आर व टेक्निकल पॅनेलमार्फत ऑनलाईन चाचणी व मुलाखती घेण्यात आल्या. निवड प्रक्रियेत एकूण २३ विद्यार्थ्यांची निवड झाल्याची माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा.सचिन पोखरकर यांनी दिली.निवड झालेल्या विद्यार्थ्यांना याझाकी इंडिया यांच्या रांजणगाव येथील प्रकल्पात इंटर्नशिप देण्यात येणार आहे. रावा हाके,आदित्य देशमुख,समाधान चौधरी,किशोर भोगाडे,माधुरी शिंदे,दिव्या निलख,रोहन गावडे,साक्षी गोर्डे,साक्षी कोल्हे,सुरज पवार,प्रेरना शिंदे,वैष्णवी जाधव,दत्ता राजापूरे,रोहन वाघ, आफताब मुनावर,कुणाल बडवे,पवन गुंजाळ,सौरभ भडंगे,सोहेल पटेल,तेजस बाचकर,विठ्ठल कोळेकर,किशोर पाल,आरती औटी. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे,प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर तसेच संकुलातील सर्व प्राचार्य,विभागप्रमुख,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.**

# ग्लोबल इंग्लिश स्कूलचा वार्षिक कार्निव्हल मेळावा उत्साहात संपन्न

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

ग्लोबल इंग्लिश स्कूल, दिवा (पूर्व) यांचा २० व २१ डिसेंबर रोजी रुणवाल ग्राउंड येथे आपला पहिला वार्षिक कार्निव्हल मेळावा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सदर वार्षिक कार्निव्हल मेळावा दोन दिवस मोठ्या आनंदात व जल्लोषात पार पडला तर सदर कार्यक्रमास पहिल्या दिवशी मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा. अनिल शिंदे व दुसऱ्या दिवशी मा. नितीन पगार, पोलीस निरीक्षक मुंब्रा पोलीस स्टेशन व मा. राजू पाचोरकर पोलीस निरीक्षक व इतर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.




सन्मानीय अतिथी यांचेहस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली तर विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक सादरीकरणांनी वार्षिक कार्निव्हल मेळावा मोठ्या रंगतदार व उत्साहात पार पडला. सदर वार्षिक कार्निव्हल मेळाव्याच्या निमित्ताने नृत्यप्रस्तुती, लाईव्ह गायन, जादूचे प्रयोग, मिमिक्री तसेच टॅलेंट हंट अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्यांचे प्रभावी सादरीकरण केले.

याशिवाय विज्ञान प्रदर्शन, मनोरंजक खेळ, विविध राईड्स आणि शिक्षक-विद्यार्थ्यांनी आयोजित केलेला खाद्यपदार्थ विभाग हेही विशेष आकर्षण ठरले. प्रसंगी शाळेचे संचालक महेंद्र दळवी, मुख्याद्यापिका ज्योत्सना सोनी मॅडम, संगीता भालेराव तसेच पालक, विद्यार्थी व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शाळेचा पहिला कार्निव्हल मेळा यशस्वी व अविस्मरणीय ठरला.

# इंडिया इंटरनॅशनल ट्रॅव्हल मार्ट यशस्वीरित्या संपन्न

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

इंडिया इंटरनॅशनल ट्रॅव्हल मार्ट (आयआयटीएम) पुणे 2025 चा 26 वा आवृत्ती येरवडा येथील डेक्कन कॉलेज ग्राउंड्स येथे तीन दिवसांच्या उत्साही व्यवसाय नेटवर्किंग, गंतव्य प्रदर्शन आणि प्रवास सहभागानंतर यशस्वीरित्या संपन्न झाला. पश्चिम भारतातील प्रमुख प्रवास प्रदर्शन म्हणून आपले स्थान अधिक दृढ करत, आयआयटीएम पुणेने पुन्हा एकदा जागतिक आणि भारतीय पर्यटन परिसंस्थेला एकाच छताखाली आणले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन मान्यवर प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यामध्ये नेपाळ पर्यटन मंडळाचे कार्यकारी समिती सदस्य श्री. नरेंद्र देव भट्टा; ट्रॅव्हल एजंट्स असोसिएशन ऑफ पुणेचे अध्यक्ष श्री. निलेश भन्साली; पुणे हॉटेलिअर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. अमित कुमार शर्मा; ईएएआयचे बोर्ड सदस्य आणि पश्चिम भारत विभागाचे अध्यक्ष श्री. जीवन हेंद्रे; टीएएआयचे मानद सचिव श्री. यझदी मार्कर; स्काल इंटरनॅशनल पुणेचे अध्यक्ष श्री. शाहबेहराम रब्बानी; ॲग्री टुरिझमचे संस्थापक श्री. पांडुरंग तवरे; तसेच श्री. स्वप्नील राजे होळकर यांचा समावेश होता.

१० हून अधिक देश आणि २० भारतीय राज्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या २०० हून अधिक प्रदर्शकांच्या सहभागासह, आयआयटीएम पुणे 2025 मध्ये विविध गंतव्यस्थाने, प्रवास उत्पादने, आतिथ्य ब्रँड्स, एअरलाईन्स, क्रूझ कंपन्या, डेस्टिनेशन मॅनेजमेंट कंपन्या आणि ट्रॅव्हल टेक्नॉलॉजी सेवा प्रदात्यांचे सादरीकरण करण्यात आले.

# मंदिर जीर्णोद्धारासाठी मदतीची घोषणा; भाविकांमध्ये समाधानाची भावना



**जऊळके खुर्द (ता. खेड) : (समर्थ गांवकरी)**

येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराजांच्या काल्याच्या किर्तन कार्यक्रमात नानजीभाई ठक्कर यांच्या उपस्थितीने संपूर्ण गावात भक्तीमय व आनंदी वातावरण निर्माण झाले. धार्मिक श्रद्धेसोबतच गावाच्या विकासाची जाणीव ठेवत भैरवनाथ मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी मदत करण्याची त्यांनी केलेली घोषणा ही गावकऱ्यांसाठी अभिमानास्पद व दिलासा देणारी ठरली. नानजीभाई ठक्कर यांनी दाखवलेले हे योगदान केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित नसून, गाव, देवस्थान आणि भाविकांप्रती असलेल्या त्यांच्या जिव्हाळ्याचे प्रतीक आहे. त्यांच्या या कृतीतून ग्रामविकासासाठी असलेली आपुलकी व समाजाशी नातं घट्ट करणारे प्रेम स्पष्टपणे दिसून आले.

या पवित्र कार्यक्रमाला खेड तालुक्यातील राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर, तसेच कला, क्रीडा, शेतकरी, महिला आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक वाद्यांचा गजर, किर्तनकारांचे प्रबोधनपर विचार आणि भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

# बोगस डॉक्टरांवर कठोर कारवाई होणार - जिल्हाधिकारी

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे जिल्ह्यात खासगी सराव करणाऱ्या बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिले आहेत. नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ करणाऱ्या बोगस डॉक्टरांमुळे गंभीर धोके निर्माण होत असून अशा व्यक्तींना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही. बोगस डॉक्टरांचा शोध घेण्यासाठी जिल्हास्तरीय समितीमार्फत नियमित तपासण्या करून दोषींवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी अशा सूचनाही त्यांनी दिल्या. जिल्हा आरोग्य विभागाच्या विविध योजनांचा व कामकाजाचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.



जिल्हाधिकारी तथा आरोग्य समित्यांचे अध्यक्ष डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेच्या कार्यप्रणालीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीत आयुष्यमान भारत आरोग्य कार्ड समिती, १५ वा वित्त आयोग आढावा, जिल्हास्तरीय नियमित लसीकरण टास्क फोर्स समिती, संसर्गजन्य आजार प्रतिबंध व नियंत्रण समिती, वातावरणीय बदल व मानवी आरोग्य जिल्हास्तरीय टास्क फोर्स समिती तसेच बोगस डॉक्टर शोध व पुनर्विलोकन समितीच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आयुष्यमान भारत आरोग्य कार्डबाबत अधिक प्रभावी जनजागृती करणे गरजेचे असून, रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांसोबत त्यांच्या सोबत असलेल्या नातेवाईकांनाही आयुष्यमान कार्ड काढण्याबाबत माहिती देण्यात यावी असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. यामुळे अधिकाधिक पात्र नागरिकांना शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ मिळू शकेल, असे त्यांनी नमूद केले. याच समवेत जिल्ह्यातील लसीकरण मोहिमा वेळेत व प्रभावीपणे राबवाव्यात. तसेच वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या आजारांबाबत वन्यप्राणी विभागाने आवश्यक ती खबरदारी घ्यावी, अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या. या बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्यासह सर्व नगरपालिका व महानगरपालिकांचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/१३३/२०२५ — अकोले दि. २२/१२/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. वेणू सखाराम खडके, रा.घाटघर,** ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **यांचा मुलगा कु.दत्ता सखाराम खडके याचा जन्म दि. ०२/०६/२००० रोजी घाटघर** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **घाटघर,** ता. अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्रीम. वेणू सखाराम खडके, रा.घाटघर,** ता.अकोले, जि. अहिल्यानगर **यांचा मुलगा कु.दत्ता सखाराम खडके याचा जन्म दि. ०२/०६/२००० रोजी घाटघर** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **घाटघर,** ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. २२/१२/२०२५ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# अंबरनाथमध्ये बंधबिगार कामगारांची सुटका

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

एकविसाव्या शतकातही बंधबिगार पद्धती अस्तित्वात असल्याचे धक्कादायक वास्तव अंबरनाथमध्ये उघडकीस आले असून, ठाणे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या नेतृत्वात नाल्सा (National Legal Services Authority) योजनेंतर्गत ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या विशेष पथकाने केलेल्या कारवाईत मे. शक्ती फूड इंडस्ट्रीज कंपनी, अंबरनाथ पश्चिम या कंपनीत असलेल्या 10 परप्रांतियांची बंधबिगाराच्या विळख्यातून सुखरूप सुटका करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या विशेष पथकाच्या सदस्या ॲड. तृप्ती पाटील यांनी दिली. 17 डिसेंबर रोजी कमलेश फुन्नन बनवासी, रा. उत्तर प्रदेश या बंधबिगार कामगाराने स्वतःची सुटका करून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी संपर्क साधल्यानंतर उघडकीस आली. संबंधित कामगाराने आपली व्यथा मांडल्यानंतर, या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन स्पेशल सेलमार्फत तातडीने अर्ज तयार करून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, न्यायमूर्ती रवींद्र पाजणकर यांच्याकडे सादर करण्यात आला.या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून श्री. पाजणकर यांनी त्वरित जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे अधिकृत पत्र दिले. नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या निवडणूकीचे अत्यंत व्यस्त कार्यक्रम असूनही जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी या प्रकरणाची तातडीने गंभीर दखल घेत संबंधित सर्व विभागांना तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यांच्या तत्परतेमुळे महसूल, पोलीस व कामगार विभाग यांचा समन्वय साधत तातडीची कारवाई सुरू करण्यात आली. उत्तर प्रदेशातील भदोही, जौनपूर आदी जिल्ह्यांतून 1. सिंटु विनोद बनवासी, वय 18 वर्षे 2. चंदू हरि बनवासी, वय 40 वर्षे 3. संजय डाक्टर बनवासी, वय 22 वर्षे 4. कल्लू बनवासी 5. सुरज बनवासी 6. संजय खिल्लारी बनवासी, वय 19 वर्षे 7. सुरेश बनवासी 8. सुकुड विजई 9. सुखी पन्ना 10. विजय कुमार श्रीराम, वय 34 वर्षे यांना ठेकेदार निक्की उर्फ कृष्णा कुमार अग्रहारी व नितिन तिवारी याने चांगल्या कंपनीत 18 ते 20 हजाराची नोकरी तसेच राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था करुन देतो असे आमिष दाखवून अंबरनाथ पश्चिम येथील मे.शक्ती फूड इंडस्ट्रीज कंपनीत नोकरीला लावले. मात्र प्रत्यक्षात त्यांना अत्यंत जड कामे, उपाशीपोटी काम, अपुरी व निकृष्ट जेवण व्यवस्था, मारहाण व वेतन न देणे अशा अमानुष परिस्थितीला सामोरे जावे लागले. या कामगारांना एका लहान खोलीत कोंबून ठेवण्यात येत असे. रात्री त्या खोलीला बाहेरून कुलूप लावले जाई आणि सकाळी पुन्हा कामावर नेले जाई. मोबाईल फोन जप्त करून त्यांचा नातेवाईकांशी संपर्क तोडण्यात आला होता. हा प्रकार संगनमताने व नियोजनपूर्वक करण्यात आल्याचे तपासात स्पष्ट झाले. जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्या निर्देशानुसार निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने यांच्या मार्गदर्शनाखाली अंबरनाथचे तहसिलदार श्री.अमित पुरी, सर्कल अधिकारी श्री.सागवे, कामगार विभागाचे उपायुक्त संभाजी व्हनाळकर यांच्या सूचनेनुसार सहाय्यक कामगार आयुक्त अनघा क्षीरसागर यांच्या प्रतिनिधी रजनी भोर व त्यांचे इतर सहकारी,तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक शब्बीर सैय्यद यांच्या नेतृत्वाखाली पथक तैनात करण्यात आले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# केंद्रस्तरीय गुणदर्शन स्पर्धेत दणदणीत यश

**राजापूर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील राजापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या सुप्त कलागुणांचे दर्शन घडवत केंद्रस्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे.

बुधवारी केंद्रातील गुंजाळवाडी येथे केंद्रस्तरीय गुणदर्शन स्पर्धा संपन्न झाल्या.

या स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध विभागात प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावत शाळेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक परंपरेचा लौकिक वाढवला. दिनांक १७ डिसेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या या स्पर्धेत राजापूरच्या बाल चमूनी आपल्या कलागुणांनी उपस्थितांची मने जिंकली. या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. यामध्ये शौर्य दीपक जाधव गीत गायन बालगट प्रथम क्रमांक तर संस्कृती अजय



मोहिते गीत गायन किलबिल गट प्रथम क्रमांक आणि जागृती सुधीर भालेकर वेशभूषा किलबिल गट प्रथम क्रमांक प्राप्त केले आहे आराध्या हरेश खेडकर वक्तृत्व स्पर्धा बालगट द्वितीय क्रमांक.

शौर्य सचिन साळवे वक्तृत्व स्पर्धा किलबिल गट तृतीय क्रमांक.

आरोही रवींद्र जाधव हस्ताक्षर स्पर्धा द्वितीय क्रमांक.

अक्षरा अक्षय हासे*हस्ताक्षर स्पर्धा किलबिल गट द्वितीय क्रमांक. आणि गोष्ट सादरीकरण बालगट आराध्या सुनील देशमुख द्वितीय क्रमांक. तसेच वेशभूषा सादरीकरण बालगट स्वरा सचिन सातपुते द्वितीय क्रमांक. आणि समूहगीत गायन (पोषण गीत) द्वितीय क्रमांक. तर सांस्कृतिक कार्यक्रमात नाटिका (जुने फर्निचर) या नाटिकेचा द्वितीय क्रमांक आलेला आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी वैयक्तिक व सामूहिक गटात यश संपादन केले आहे. या यशामागे शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. राधाबाई आरोटे तसेच शिक्षिका श्रीम.उज्वला माने श्रीम.उज्वला देशमुख ,श्रीम.स्वप्नाली आहेर ,श्रीम. प्रतिभा दुर्गुडे श्रीम. ज्योती घोटेकर व श्री.शिरोळे सर या सर्वांचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल गट शिक्षण अधिकारी श्री. गुंड साहेब शिक्षण विस्तार अधिकारी श्रीम. वलवे मॅडम, केंद्र प्रमुख श्री.अनाप साहेब तसेच राजापूरचे सरपंच सौ . कुसुमताई पानसरे, उपसरपंच तसेच SMC चे अध्यक्ष श्री. सुनील गोसावी, उपाध्यक्ष श्री. सचिन हासे आणि सर्व सदस्य तसेच गावातील ग्रामस्थ, पालक तसेच शिक्षणप्रेमी नागरिक या सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.




## सोनाली ताईंचा उत्कृष्ट कामकाजाबद्दल सन्मान

**गणोरे : (समर्थ गांवकरी)**

आढळा परिसरातील सर्वात मोठे बीट असणाऱ्या देवठाण गटांमध्ये कार्यरत असणाऱ्या सुपरवायझर सोनाली ताई भानगड यांचे उत्कृष्ट कामकाजाबद्दल जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्यामार्फत नुकतेच गौरविण्यात आले होते. याबद्दल त्यांचा गणोरे ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष आंबरे व ग्रामपंचायत अधिकारी अशोक बलसाने यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. अकोले तालुक्यातील देवठाण बिटा मध्ये ३२ अंगणवाड्यांचे प्रशासकीय कामकाज असते. याची सर्व माहिती वेळोवेळी ऑनलाईन नीटनेटके स्वरूपात व वेळेत देण्याची उत्तम व्यवस्था सोनाली ताई करत असतात. त्यांच्या या कार्याची पोहोच पावती म्हणून तालुक्यातील प्रकल्पाचे विभागीय अधिकारी पगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय कदम यांच्या हस्ते त्यांना नुकतेच अहिल्यानगर येथे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले होते. त्यांच्या परिश्रमाला साथ देणाऱ्या गणोरे ग्रामपंचायतीमार्फत त्यांचा फेटा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी सरपंच संतोष आंबरे, ग्रामपंचायत अधिकारी अशोक बलसाने,संत नामदेव आंबरे, संजय आंबरे,योगिता आंबरे, अंगणवाडी सेविका वंदना गोसावी, अंजनाताई शिंदे, शोभा गोसावी, शांताताई हांडे,अर्चना शिंदे आरोग्य विभागाचे कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते.

## अश्विनी कोतवाड यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरूड ता. जि. लातूर द्वारा संचलित, शिक्षक अधिकारी व कर्मचारी 2025-26 विभागस्तर स्पर्धेत कस्तुरबा गांधी कन्या विद्यालय बिलोली येथील उपक्रमशील शिक्षिका अश्विनी कोतवाड यांनी विभागीय स्तरावर वक्तृत्व स्पर्धेत दैदीप्यमान यश संपादन करून रायगड येथे होऊ घातलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सौ. अश्विनी कोतवाड एक उपक्रमशील व प्रयोगशील शिक्षिका म्हणून त्यांचा शाळेमध्ये नावलौकिक आहे. अत्यंत विद्यार्थिनी प्रिय असलेल्या त्या शिक्षिका आहेत. आपल्या विषयावर प्रभुत्व व विद्यार्थी हेच आपले सर्वस्व मानणाऱ्या



कोतवाड आहेत. विविध स्पर्धेची, वक्तृत्व स्पर्धेची, शिष्यवृत्तीची तयारी अशा विविध उपक्रमात ते हिरीरीने भाग घेतात. साधन व्यक्ती म्हणून त्यांनी राज्यस्तरापर्यंत कार्य केले आहे विद्यार्थी हेच आपले दैवत म्हणून सतत विद्यार्थ्यांचा ध्यास हा त्यांचा असतो. सुट्टी असो वा शाळा सतत कार्य मग्न हाच ध्यास त्यांचा असतो. नुकत्याच संपन्न झालेल्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरूड ता. जि. लातूर द्वारा संचलित, शिक्षक अधिकारी व कर्मचारी विभागस्तर स्पर्धेत विभागीय स्तरावर दैदीप्यमान यश संपादन करून रायगड येथे होऊ घातलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी नुकतीच निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी बी. एम. पाटील, कस्तुरबा गांधी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, शिक्षिका, कर्मचारी, विद्यार्थी यांनी अश्विनी कोतवाड यांचे अभिनंदन केले आहे.

## निमित्त स्नेहमेळाव्याचे, औचित्य प्रयोगशाळेचे

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्री ज्ञानेश्वर विद्यालय सावरगाव माजी विद्यार्थी बॅच १९७९/८८ शाळेला दिले प्रयोगशाळा साहित्य श्री ज्ञानेश्वर विद्यालय सावरगाव- बस्ती येथे ३७ वर्षानंतर प्रथमच माजी विद्यार्थ्यांचा (१९७९-८८ पाचवी ते दहावी वर्ग) स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला. शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी शाळेला रु. ३००००/- किमतीचे प्रयोगशाळा साहित्य भेट दिले. तसेच सर्व माजी विद्यार्थ्यांतर्फे सुसज्ज प्रयोगशाळा उभारण्याचा मानस व्यक्त केला. तसेच आठवण म्हणून शाळेत वृक्षारोपण करण्यात आले.

# शिक्षक जोमात, विद्यार्थी कोमात

## आखरगा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

मुखेड तालुक्यातील आखरगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये शासकीय अनुदानाचा गैरवापर, शासन आदेशांचे उल्लंघन, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष तसेच शैक्षणिक गुणवत्तेची गंभीर घसरण झाल्याचा आरोप करत गावातील सुजाण पालक व नागरिकांनी जिल्हा परिषद नांदेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे थेट तक्रार अर्ज सादर केला आहे. आखरगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पहिली ते आठवीपर्यंत कार्यरत असून, सदर शाळेत तब्बल सात शिक्षक कार्यरत आहेत. या शिक्षकांच्या वेतनावर दरमहा सुमारे ७ लाख रुपये शासकीय खर्च होत

### संतप्त पालकांची सीईओंकडे तक्रार – कारवाईची मागणी

असतानाही विद्यार्थ्यांना दर्जेदार, कौशल्याधिष्ठित व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नसल्याचे पालकांचे म्हणणे आहे. याचा गंभीर परिणाम म्हणजे मागील तीन ते चार वर्षांत या शाळेतील एकही विद्यार्थी नवोदय विद्यालय किंवा शिष्यवृत्ती परीक्षेत निवडला गेलेला नाही, ही बाब शैक्षणिक अपयशाचे द्योतक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच शाळेला दरवर्षी सुमारे ५० हजार रुपयांचे शासकीय अनुदान मिळत असताना, त्या निधीचा वापर शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी न करता मुख्याध्यापक व शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांच्या संगनमताने गैरवापर व अपहार केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. शासन आदेशानुसार शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अनिवार्य असतानाही आजतागायत शाळेत सीसीटीव्ही बसविण्यात आलेले नाहीत.

शाळा गावाच्या बाहेरील परिसरात असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, भविष्यात कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर राहील, असा इशाराही पालकांनी दिला आहे.

याशिवाय, शाळेत कार्यरत असलेली एक सेवाज्येष्ठ शिक्षिका ही 2025–26 च्या संच मान्यतेनुसार अतिरिक्त ठरत असून त्यांचे तात्काळ समायोजन करून इतरत्र शाळेत बदली करावी कारण त्या शिक्षिका गावातील स्थानिक रहिवाशी असल्याकारणे त्या गावातील स्थानिक राजकारणात ढवळाढवळ करून गावातील आपल्या राजकीय समर्थकाला पैसे पुरवत असल्याचे देखील गंभीर आरोप गावातून होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे .

त्या शिक्षिकेच्या राजकारणामुळे शालेय वातावरण बिघडत असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर सुद्धा त्याचा परिणाम होत असल्याचा आरोप करत पालकांनी तातडीने बदलीची मागणी केली आहे.

## कळवणच्या ओतूरमध्ये दारू व्यसनमुक्तीचा खुले बाजार

**कळवण : (समर्थ गांवकरी)**

कळवण तालुक्यातील ओतूर गावात सध्या एक गंभीर आणि समाजासाठी धोकादायक वास्तव उघड होत आहे. कायद्याने बंदी असलेल्या दारू, गुटखा, सिगारेट, तंबाखू यांची खुलेआम विक्री व सार्वजनिक ठिकाणी सर्रास धुम्रपान होत असून, याकडे संबंधित उत्पादन शुल्क विभाग व अन्न व औषध प्रशासन विभाग जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे ही व्यसने शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये, वाड्या वस्तीच्या आसपास सहज उपलब्ध होत आहेत. ज्या ठिकाणी संस्कार, शिक्षण आणि श्रद्धा रुजायला हव्यात, तिथेच व्यसनांचे विष पसरवले जात आहे.

निष्पाप विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तकाऐवजी गुटखा सिगारेट आणि दारूच्या बाटल्या!



आज ओतूरमध्ये लहान वयातील विद्यार्थी सहजपणे गुटखा, सिगारेट, दारू खरेदी करताना दिसतात. शाळा सुटल्यानंतर थेट पानटपरीवर गर्दी करणारी मुले ही केवळ पालकांसाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी चिंतेची बाब आहे.

उद्या हीच पिढी व्यसनाधीन झाली,तर गुन्हेगारीकडे वळली तर जबाबदार कोण?

कायद्याचे फलक आहेत... पण अंमलबजावणी कुठे आहे?"शाळेच्या १०० मीटर परिसरात तंबाखू गुटखा सिगारेट दारू विक्रीस बंदी" असे फलक लावलेले दिसतात नाही; मात्र प्रत्यक्षात त्यात गुटखा, सिगारेटची खुलेआम विक्री सुरू आहे.

हे दृश्य पाहून एकच प्रश्न निर्माण होतो – कायदा फक्त कागदावरच आहे का?संबंधित विभागांचे रहस्यमय मौन

उत्पादन शुल्क विभाग, अन्न व औषध प्रशासन, स्थानिक पोलीस प्रशासन यांनी याकडे आजपर्यंत ठोस कारवाई का केली नाही?या बेकायदेशीर विक्रीमागे कोणाचा आशीर्वाद आहे का?

की कारवाई न करण्यामागे आर्थिक हितसंबंध दडले आहेत का?

लोकप्रतिनिधींचीही जबाबदारी टाळाटाळ

निवडणुकीच्या काळात "तरुणाई आमची ताकद" म्हणणारे लोकप्रतिनिधी, आज तरुणाई व्यसनाधीन होत असताना कुठे आहेत?गावाचा विकास म्हणजे फक्त रस्ते आणि इमारती नव्हेत, तर व्यसनमुक्त, सशक्त पिढी घडवणे ही खरी विकासाची कसोटी आहे.

आज नाही थांबलो, तर उद्या उशीर होईल!

ओतूरमध्ये सुरू असलेली ही परिस्थिती वेळीच रोखली नाही, तर याचे भयावह परिणाम भविष्यात दिसून येतील. आजचा निष्क्रियपणा उद्या संपूर्ण पिढीला बरबाद करू शकतो.

## राधाबाई तुकाराम बर्लेवाड यांचे निधन

**नांदेड: (समर्थ गांवकरी)**



नांदेड राधाबाई तुकाराम बर्लेवाड रा कोलंबी ता.नायगाव (खै) यांचेआज सोमवार दिनांक २२ डिसेंबर रोजी सायंकाळी ठीक ५ वाजता दिर्घ आजाराने निधन झाले . आहे मृत्यू समयी त्यांचे वय ९० वर्ष होते त्याचा अंत्यविधी मंगळ वार दिनांक २३ डिसेंबर रोजी दुपारी ठीक १ वा. समशान भूमी कोलंबी येतेआहे.एम. एस. ई. बी चे हळदा येथील वरिष्ठ अभियांत्रिकी चालक जयवंत तुकाराम बर्लेवाड यांच्या मातोश्री आहेत त्यांच्या पश्चात दोन मुलं एक मुलगी दोन सुना सातनातवंडे आहेत ओबीसी संघटना नांदेड तालुका उपाध्यक्ष बालाजी आचमे यांच्या आजी आहेत.

## माळेगाव यात्रेत लावणी महोत्सवाचे भव्य उद्घाटन

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

तिर्थ क्षेत्र माळेगाव यात्रा ही शेतकरी, कष्टकरी आणि कलावंतांची यात्रा असून या ठिकाणी त्यांच्या कलेचा आणि मेहनतीचा सन्मान केला जातो. लावणीसारखा पारंपरिक लोककलेचा प्रकार खुल्या वातावरणात सादर करण्याची माळेगावची समृद्ध परंपरा असून अकलूजच्या धर्तीवर माळेगावात लावणी महोत्सव सुरू करण्यात आला आहे, असे प्रतिपादन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.

श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेनिमित्त आयोजित लावणी महोत्सवाचे उद्घाटन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते आज संपन्न झाले. याप्रसंगी माजी आमदार मोहनराव हंबर्डे, लोहा नगरपालिकेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष शरद पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण




विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ संजय तुबाकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, यात्रा सचिव डी. बी. गिरी, शिक्षणाधिकारी माधव सलगर, सरपंच प्रतिनिधी हनमंत धुळगंडे, दत्ता वाले, सुधाकर शिंदे, आनंदराव शिंदे, सचिन पाटील चिखलीकर, पोलीस उपविभागीय अधिकारी श्याम पाळेकर, अश्विनी जगताप, तहसीलदार परळीकर, उपजिल्हाधिकारी दापकर, बाळासाहेब मुळे, तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे, मनोहर भोसीकर, माधवराव पावडे, दत्ता वाले, गटविकास अधिकारी महेंद्र कुलकर्णी, आनंदराव ढाकणीकर नरेंद्र गायकवाड, रोहित पाटील, गणेशराव साळवे, अनिल पाटील बोरगावकर, बालाजी राठोड, आनंदराव गुंडले आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार चिखलीकर म्हणाले, माळेगाव यात्रेचे जिल्हा प्रशासनाने अत्यंत सुयोग्य नियोजन केले असून त्याबद्दल त्यांनी प्रशासनाचे व पोलीस यंत्रणेचे आभार मानले. लावणी कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी मानधनात वाढ करण्यात आली असून भविष्यात आणखी मोठे व सुसज्ज व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या व्यासपीठावरून अनेक कलावंत मोठे झाले असल्याचेही त्यांनी नमूद केले. लावणी महोत्सवामुळे माळेगाव यात्रेच्या सांस्कृतिक वैभवात भर पडली असून यात्रेकरूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## काजळे यांना नियतीने न्याय दिला
### *माजी आमदार दांगट*



**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर शहरातील नागरिकांच्या ज्या अपेक्षा आहेत त्या पूर्ण कराव्यात . नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्षा सुजाता काजळे यांना नियतीने न्याय दिला आहे. असे गौरव उद्गार माजी आमदार बाळासाहेब दागट यांनी स्वागत करताना काढले.

माजी आमदार दांगट पुढे म्हणाले की , जुन्नरकरांना न्याय द्यावा . दर्याघाटा बाबतीत प्रयत्न करा . शहरातील अतिक्रमण बाबत लक्ष घाला . संघटना आपल्या पाठीशी भक्कमपणे उभी आहे असे नगराध्यक्ष सुजाता काजळे यांचे स्वागत करताना माजी आमदार दांगट यांनी सांगितले.

यावेळी नगराध्यक्षा सुजाता काजळे यांनी सांगितले की, माजी आमदार बाळासाहेब दांगट यांनी दिलेले सूचना व मार्गदर्शन निश्चित पुढील वाटचालीस महत्त्वाचे राहील. शहरातील काँक्रिटीकरण , पाणी , वीज ,बंदिस्त गटार , रस्ते व नागरिकांचे प्रश्न सर्व नगरसेवकांना घेऊन सोडवण्यासाठी कटिबद्ध राहणार असे नगराध्यक्षा काजळे यांनी सांगितले. याप्रसंगी ज्येष्ठ नेत्या मंदाकिनी दांगट , माजी नगरसेवक मधुकर काजळे , सामाजिक कार्यकर्ते माऊली काजळे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## माय माऊली केअर सेंटरला नवे नाव, नवी ओळख; सेवा विस्ताराचा संकल्प!

**कात्रज (पुणे) : (समर्थ गांवकरी)**

पुण्यातील कात्रज-कोंढवा रोडवर कार्यरत असलेले माय माऊली केअर सेंटर आता नव्या रूपात आणि नव्या नावाने समाजसेवेस अधिक बळ देणार आहे. यापुढे ही संस्था "स्व. ठक्कर धनलक्ष्मीबेन ठाणावाला सेवाधाम आश्रम संचलित माय माऊली केअर सेंटर" या नावाने कार्यरत राहणार असून, यामुळे संस्थेला राज्य, देश आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळणार आहे.

ही घोषणा नुकत्याच पार पडलेल्या ज्येष्ठ नागरिक आनंद मेळाव्यात करण्यात आली. या वेळी दानशूर, समाजरत्न, समाजभूषण आणि उद्योगरत्न शेठ डॉ. नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी संस्थेला भेट देत आपले मनोगत व्यक्त केले.




"मी अनेक मंदिरे, शाळा आणि संस्था उभारल्या; पण 'माय माऊली' सारखी माणुसकी जपणारी संस्था उभी राहणे मला अधिक महत्त्वाचे वाटते," असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

डॉ. नानजीभाई ठक्कर यांच्या आगमनावेळी माय माऊली परिवाराच्या वतीने चरणकमल पाद्यपूजन करून त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांनी गोरगरीब, निराधार आणि अनाथ आजी-आजोबांच्या सेवेसाठी कायमस्वरूपी साथ देण्याचा संकल्प व्यक्त केला. त्यांच्या कृपा-आशीर्वादाने संस्थेच्या पाठीशी भक्कम आधार मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठलराव वरुडे पाटील यांनी सांगितले की, डॉ. नानजीभाई ठक्कर यांची साथ लाभल्याने माय माऊली केअर सेंटरचे सेवाकार्य अधिक व्यापक होणार असून, राज्यभर तसेच देशभर संस्थेचे नाव पोहोचेल. "त्यांच्या पाठबळामुळे आमच्या कामाला परिसस्पर्श होईल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर चालणाऱ्या माय माऊली केअर सेंटरमध्ये बेडरिडन, कोमातील रुग्ण, अल्झायमर, डिमेन्शिया, पॅरालिसिस व फ्रॅक्चर झालेल्या वृद्धांची विशेष काळजी घेतली जाते. तज्ज्ञ डॉक्टर, प्रशिक्षित नर्सेस, २४ तास सेवकवर्ग, स्वच्छ व सुरक्षित परिसर, सीसीटीव्ही निगराणी आणि भक्तीमय वातावरण हे संस्थेचे वैशिष्ट्य आहे. आर्थिकदृष्ट्या अत्यंत दुर्बल आणि अनाथ वृद्धांची सेवा येथे पूर्णपणे विनामोबदला केली जाते.

संस्थेच्या आवारातील श्री विठ्ठल-रखूमाई मंदिरामुळे येथे भक्ती आणि शक्तीचा सुंदर संगम अनुभवायला मिळतो. पहाटेचा घंटानाद, भजन-कीर्तनामुळे वृद्धांना मानसिक आधार मिळतो.

डॉ. नानजीभाई ठक्कर यांच्यासारख्या दानशूर व्यक्तिमत्त्वाच्या साथीतून भविष्यात माय माऊली केअर सेंटरचे जाळे अधिक व्यापक करण्याचा मानस आहे. "वृद्धांना केवळ जगवणे नव्हे, तर आनंदाने जगवणे" हेच संस्थेचे मूळ ध्येय असल्याचे वरुडे पाटील यांनी सांगितले.

संपर्क:

लायन विठ्ठलराव वरुडे पाटील
संस्थापक अध्यक्ष, माय माऊली केअर सेंटर
इंडियन ऑइल पेट्रोल पंपासमोर, कात्रज-कोंढवा रोड, पुणे – ४६
मो. ९६३७५१२१५१ / ९८२२०१२७०७

आपल्या आसपास गरजू वृद्ध असतील किंवा समाजसेवेत हातभार लावायचा असेल, तर माय माऊली केअर सेंटरला अवश्य भेट द्या. आपले थोडेसे योगदानही अनेकांच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश पसरवू शकते.

# 'बायोलॉजिकल ब्लूप्रिंट' तंत्रज्ञान लाँच

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



धावपळीची जीवनशैली, कामाचा प्रचंड ताण आणि चुकीच्या आहारपद्धतीमुळे आजचा तरुण आणि मध्यमवयीन वर्ग विविध व्याधींच्या विळख्यात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर, आरोग्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी आणि 'रिस्टोरेटिव्ह हेल्थकेअर' (पुनरुज्जीवन आरोग्य सेवा) क्षेत्रात क्रांती घडवण्यासाठी 'ट्रूपिक ™ हेल्थ' (Trupeak™ Health) सज्ज झाले आहे. आज पुण्यात एफसी रोड येथे या केंद्राचे भव्य उद्घाटन करण्यात आले. भारतात पहिल्यांदाच 'बायोलॉजिकल ब्लूप्रिंट' बदलणारे अत्याधुनिक तंत्रज्ञान याद्वारे सादर करण्यात आले आहे.

सोशल मीडियावरील अपुऱ्या माहितीच्या आधारे दिले जाणारे सल्ले आणि 'फॅड डाएट्स' (Fads) यांना छेद देण्यासाठी नामांकित डॉक्टरांनी एकत्र येऊन ट्रूपिक हेल्थची स्थापना केली आहे. डॉ. संजीव शशीधरन, डॉ. गौरव मिश्रा, डॉ. विक्रमादित्य साळवी, डॉ. अमित चक्रवर्ती आणि वरुण त्रिपाठी या तज्ज्ञांच्या नेतृत्वाखाली हे केंद्र कार्यरत असेल. २० अनुभवी डॉक्टरांचा यात गुंतवणूकदार म्हणून सहभाग आहे.

ट्रूपिक हेल्थ केवळ एक वेलनेस क्लिनिक नसून, ते विज्ञानावर आधारित उपचार केंद्र आहे. भारतात पहिल्यांदाच याद्वारे 'इनडायरेक्ट कॅलरीमेट्री' (Indirect Calorimetry) आणि 'मसल साऊंड' (MuscleSound™) ही दोन जागतिक दर्जाची तंत्रज्ञाने आणली जात आहेत.

इनडायरेक्ट कॅलरीमेट्री: याद्वारे व्यक्तीच्या चयापचय (Metabolism) क्रियेचा अचूक अभ्यास केला जातो.

मसल साऊंड: शरीरातील स्नायूंमध्ये किती ग्लायकोजेन (ऊर्जा) आहे, याची मोजणी केली जाते.

या तंत्रज्ञानामुळे ओझेंपिक (Ozempic) किंवा वजन कमी करण्याच्या औषधांमुळे होणारे दुष्परिणाम टाळून, स्नायूंचे आरोग्य राखून वजन कमी करणे शक्य होणार आहे.

'सीईओ प्रोटोकॉल' (CEO Protocol): अतिदक्ष व्यावसायिकांसाठी खास उपचार

मोठ्या कंपन्यांचे अधिकारी, पोलीस दल, सशस्त्र दल (CRPF) आणि ज्यांच्यावर कामाचा प्रचंड ताण असतो, अशा लोकांसाठी ट्रूपिकने 'सीईओ प्रोटोकॉल' तयार केला आहे. यामध्ये इन्सुलिन रेझिस्टन्स, पीसीओडी (PCOD), हृदयाशी संबंधित समस्या आणि वंध्यत्वावर प्रभावी उपाययोजना केल्या जातात.

ट्रूपिक हेल्थचे प्रवक्ते वरुण त्रिपाठी यांनी सांगितले की, "आमचे ध्येय केवळ आयुष्य वाढवणे नसून, आयुष्याचा दर्जा सुधारणे हा आहे. आम्ही व्यक्तीच्या जनुकीय रचनेचा (Genetic mapping) अभ्यास करून त्याला काय हवे आहे, हे ओळखून अचूक उपचार देतो. 'फील गुड, लूक गुड आणि लिव्ह गुड' ही आमची त्रिसूत्री आहे."

मुंबई नंतर आज पुण्यात दुसरे केंद्र सुरू करण्यात आले असून लवकरच दुबईमध्ये आणि त्यानंतर बंगळुरू, अहमदाबाद, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये १० नवी केंद्रे सुरू करण्याचा मानस व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे, कर्करोग आणि किडनीच्या आजारांशी संबंधित काही उपचार विम्याच्या (Insurance) कक्षेतही येणार आहेत.

# अभिनेता हर्षवर्धन राणे यांचा पुणे दौरा

## शहराशी असलेलं भावनिक नातं व्यक्त

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



अभिनेता हर्षवर्धन राणे अलीकडेच पुण्यात दाखल झाले. यावेळी त्यांनी पुणे शहराशी असलेलं आपुलकीचं आणि भावनिक नातं व्यक्त केलं. हर्षवर्धन यांनी सांगितलं की, भारतातील उत्तम हवामान असलेल्या शहरांमध्ये पुणे दुसऱ्या क्रमांकावर आहे, त्यामुळे हे शहर त्यांच्या आवडीच्या ठिकाणांपैकी एक आहे. ते म्हणाले की, त्यांच्या बालपणाचा काही महत्त्वाचा काळ पुण्यात गेला असून, त्यामुळे पुन्हा पुण्यात येणं त्यांच्यासाठी नेहमीच भावनिक आणि आठवणींनी भरलेलं असतं. या दौऱ्यादरम्यान हर्षवर्धन यांनी पुण्यातील खाद्यसंस्कृतीचंही कौतुक केलं. विशेषतः त्यांनी बरक्का रेस्टॉरंटचा उल्लेख करत, तिथलं स्वादिष्ट अन्न, संगीत आणि एकूणच वातावरणाची प्रशंसा केली. निसर्गप्रेमी असलेल्या हर्षवर्धन राणे यांनी सांगितलं की, नवीन वर्षाचं स्वागत गर्दीच्या ठिकाणी करण्यापेक्षा जंगलात आणि निसर्गाच्या सान्निध्यात करणं त्यांना अधिक आवडतं. तसेच महाराष्ट्रात अनेक सुंदर आणि निसर्गरम्य ठिकाणं असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

# रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचा अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला पाठींबा



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या वतीने अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष राहुल डंबाळे व प्रतिनिधी यांची आज सकाळी बारामती गेस्ट हाऊस येथे बैठक पार पडली होती. या वेळी अजित पवार यांनी अल्पसंख्याक, दलित व आंबेडकरी समुदायाच्या प्रश्नांवर केलेल्या कामाच्या अनुषंगाने त्यांचे आभार व्यक्त करत हा पाठिंबा देत असल्याचे डंबाळे यांनी सांगितले. पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील आगामी योजनांच्या अंमलबजावणीत अनेक समाजोपयोगी विषय मार्गी लावण्याचे आश्वासन अजित पवार यांनी दिल्याने त्याबाबत समाधान व्यक्त करण्यात येत असल्याचे डंबाळे यांनी यावेळी सांगितले.

# क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन संपन्न

**वडाळा महादेव : (समर्थ गांवकरी)**

श्रीरामपूर तालुक्यातील प्रगती नगर येथील अशोक सहकारी साखर कारखाना संचलित माजी आमदार श्री भानुदास मुरकुटे साहेब, चेअरमन अशोक सहकारी साखर कारखाना यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या व श्रीरामपूर नगर परिषदेच्या नूतन नगरसेविका मान. सौ. मंजुश्रीताई मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यान्वित असलेल्या अशोक इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स कॉमर्स अँड आर्ट्स प्रगती नगर येथे सोमवार दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी दहा वाजता वार्षिक क्रीडा महोत्सवाचे शानदार उद्घाटन अप्पर पोलीस अधीक्षक मान. श्री सोमनाथ वाकचौरे साहेब यांचे शुभ हस्ते संपन्न झाले.

# सुसज्ज स्किलिंग परिसंस्था निर्माण करण्यामध्ये आपली भूमिका केली प्रबळ

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



फ्लिपकार्ट या भारतातील स्वदेशी ई-कॉमर्स मार्केटप्लेसने भारतातील स्किलिंग परिसंस्था प्रबळ करण्यासाठी आणि सरकारच्या स्किल इंडिया मिशनला पाठिंबा देण्यासाठी नॅशनल कौन्सिल फॉर वोकेशनल एज्युकेशन अँड ट्रेनिंग (एनसीव्हीईटी) सोबत करार केला आहे. तसेच, भारतातील झपाट्याने विकसित होत असलेल्या ई-कॉमर्स व लॉजिस्टिक्स कर्मचारीवर्गासाठी राष्ट्रीय स्तरावर मान्यताकृत, उद्योग-केंद्रित मार्ग निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. नवी दिल्लीमधील कौशल्य भवन येथे हा करार करण्यात आला. याप्रसंगी कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय (एमएसडीई) आणि एनसीव्हीईटीचे वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते. कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या (एमएसडीई) सचिव आणि एनसीव्हीईटीच्या अध्यक्षा श्रीमती देबाश्री मुखर्जी यांनी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती दर्शवत कार्यक्रमाची शोभा वाढवली.

तसेच इतर मान्यवरांसह फ्लिपकार्ट ग्रुपचे चीफ कॉर्पोरेट अफेअर्स ऑफिसर श्री. रजनीश कुमार, एनसीव्हीईटीचे कार्यकारी सदस्य प्रो. (डॉ.) अशोक कुमार गाबा आणि एनसीव्हीईटीचे संचालक लेफ्टनंट कर्नल विक्रम सिंग भाटी हे देखील उपस्थित होते. एमएसडीई अंतर्गत स्थापना करण्यात आलेली एनसीव्हीईटी नियमनामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते आणि भारतातील व्यावसायिक शिक्षण, प्रशिक्षण व स्किलिंग परिसंस्थेमध्ये दर्जा राखण्याची खात्री घेते. ही संस्था राष्ट्रीय स्तरावर प्रमाणित मानक निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करते, जे कर्मचाऱ्यांची रोजगारक्षमता अधिक प्रबळ करतात आणि शाश्वत आर्थिक विकासाप्रती योगदान देतात.

या सहयोगाच्या माध्यमातून फ्लिपकार्ट आपल्या क्षमता अधिक प्रबळ करत आहे, ज्यासह अवॉर्डिंग बॉडी (डयुअल) फॉर ट्रेनिंग, असेसमेंट अँड सर्टिफिकेशन म्हणून एनसीव्हीईटी मान्यता मिळणारी भारतातील ई-कॉमर्स क्षेत्रातील पहिली कंपनी बनेल, परिणामत: उद्योगासाठी डिझाइन करण्यात आलेले स्किलिंग प्रोग्राम्सऔपचारिकरित्या प्रमाणित, हस्तांतरणीय आणि राष्ट्रीय स्तरावर मान्यताकृत होतील.

या महत्त्वपूर्ण टप्प्यासह फ्लिपकार्ट नॅशनल स्किल्स क्वॉलिफिकेशन फ्रेमवर्क्स (एनएसक्यूएफ)शी संलग्न प्रशिक्षण उपक्रम डिझाइन व वितरित करण्यास सक्षम होईल, ज्यामधून सतत दर्जा व उद्योगाशी संलग्न असण्याची खात्री मिळेल. हा सहयोग फ्लिपकार्टला प्रमाणीकृत, उच्च दर्जाचे प्रशिक्षण व प्रमाणन उपक्रम डिझाइन करण्यास देखील मदत करेल.

# पुणेकरांसाठी खास 'सेलिब्रेशन गाईड'

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

वर्षातील सर्वात जादुई काळ जवळ येत असताना, पुणे शहर लखलखाट, उत्सव आणि उत्साही ऊर्जेने भारलेलं दिसत आहे. नाताळच्या सुरांनी निनादणारी ठिकाणं, उबदार वातावरण, झगमगती सजावट, थिरकणारे डान्स फ्लोअर्स आणि मध्यरात्रीचे रोमांचक काउंटडाउन—पुण्यातील ख्रिसमस आणि नववर्षाचा काळ म्हणजे मित्र-परिवारासोबत आनंद साजरा करण्याचा उत्सवच आहे.

या नववर्षी बुकमायशो आपल्या खास मोहिमेद्वारे तुम्हाला असे संकल्प करण्याचं आवाहन करत आहे, 'जे तुम्ही खरंच पूर्ण करू शकाल'. संकल्प सोपे ठेवा: फक्त एकच असा संकल्प करा ज्यावर तुम्ही खरोखर ठाम राहाल. तुमची आवडती निवड शोधताना, तुमच्या स्वप्नातील उत्सवात नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येचा आनंद घ्या. शहर रूफटॉप्स, डान्स फ्लोअर्स, सणांचे कार्निव्हल्स आणि आलिशान पार्ट्यांच्या अनुभवांनी गजबजलेले असताना, तुमची ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येचे नियोजन करण्याची हीच योग्य वेळ आहे.

तुम्ही एका शांत आणि उबदार नाताळच्या सेलिब्रेशनची वाट पाहत असाल किंवा संपूर्ण शहरातील धमाकेदार पार्ट्यांसह नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी उत्सुक असाल, बुकमायशोने तुमच्यासाठी सर्वात रोमांचक कार्यक्रम खास निवडले आहेत.

1. **कोपा मॉल मधील सॅन्टास्टिक वर्ल्ड**

या नाताळात कोपा मॉल, पुणे येथील सॅन्टास्टिक वर्ल्डमध्ये एका जादुई जगात प्रवेश करा! सणासुदीच्या आनंदाची एक अद्भुत दुनिया तुमची आणि तुमच्या कुटुंबाची वाट पाहत आहे, जी मनमोहक सजावट, आनंददायी उपक्रम आणि नाताळच्या उबदार वातावरणाने भरलेली आहे. सुट्टीतील अविस्मरणीय आठवणी तयार करू पाहणाऱ्या कुटुंबांसाठी योग्य असलेले सॅन्टास्टिक वर्ल्ड सर्व वयोगटांसाठी काहीतरी खास देते. या आणि या सणाच्या उत्साहात स्वतःला झोकून द्या!

कुठे : कोपा मॉल : पुणे
केव्हा : 19 डिसेंबर 2025 - 28 डिसेंबर 2025
तुमची तिकिटे मिळवा: बुकमायशो वर

2. **फिनिक्स ख्रिसमस वंडरलँड 2.0**

फिनिक्स मार्केटसिटी, पुणे येथे 'फिनिक्स ख्रिसमस वंडरलँड 2.0' सह सर्वात भव्य नाताळ उत्सवाचा अनुभव घ्या. हा प्रेक्षणीय सोहळा लखलखते दिवे, सणासुदीची सजावट, लाईव्ह मनोरंजन आणि अनेक कौटुंबिक उपक्रमांचे आश्वासन देतो. खरेदीदार आणि कुटुंबांसाठी योग्य असलेला हा सुट्टीतील एक तल्लीन करणारा अनुभव आहे, ज्यामध्ये तुम्ही या सणासुदीच्या काळातील जादूचा आनंद घेऊ शकता.

कुठे: फिनिक्स मार्केटसिटी, विमान नगर, पुणे
केव्हा: 19 डिसेंबर 2025 - 28 डिसेंबर 2025
तुमची तिकिटे मिळवा: बुकमायशो वर

3. **व्हॉट द फ्ली – ख्रिसमस कार्निव्हल**

पुण्यातील उत्साही सणासुदीची बाजारपेठ 23–25 डिसेंबर दरम्यान चालणार आहे, जिथे अभ्यागत फॅशन, लाइफस्टाइल, होम डेकोर आणि अनोख्या भेटवस्तूंचे 100+ स्टॉल्स पाहू शकतात, जागतिक खाद्यपदार्थ, लाईव्ह संगीत आणि सादरीकरणाचा आनंद घेऊ शकतात, सोबतच रंगीबेरंगी ख्रिसमस-थीम असलेल्या कार्निव्हलमध्ये मुलांसाठी स्वतंत्र किड्स झोन देखील आहे.

कुठे: महालक्ष्मी लॉन्स, खराडी: पुणे

book my show

# गुटखा वाहतुक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ओतूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि लहु थाटे यांना गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार दिनांक २१/१२/२०२५ रोजी मध्यरात्री खिरेश्वर गावच्या हद्दीत कंटेनरमधील गुटखा पिकअप गाडीत भरला जात असल्याची कारवाई करण्यात आली. रात्री २.०० ते २.३० वाजण्याच्या सुमारास कंटेनर क्रमांक एम.एच. ०१ सी.व्ही. ९१२५ मधील गुटखा पिकअप गाडी क्रमांक एम.एच. १४ जी.यु. ३७८९ मध्ये टाकताना पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत सुरज रघुनाथ मेगळे (वय २३), अतुल अनिल काळे (वय २५) व माऊली विठ्ठल काळे (वय १८, रा. रोहोकल, ता. खेड, जि. पुणे) हे तिघे मिळून आले.

# स्वच्छतेच्या माध्यमातून संत गाडगे महाराज स्मृती दिन साजरा





**देवळा : (समर्थ गांवकरी)**

आदिवासी सेवा समिती नाशिक संचालित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मानूर येथे थोर समाजसुधारक संत गाडगे महाराज यांचा स्मृती दिन महाविद्यालय व वाणिज्य विभाग यांच्या समन्वयातून साजरा करण्यात आला. सामाजिक बांधिलकी जोपासत संत गाडगे महाराजांना आदरांजली देण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. भामरे होते.

कार्यक्रमप्रसंगी प्राचार्य डॉ. आर. पी. भामरे यांनी संत गाडगे महाराज यांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करत मनोगत व्यक्त केले. स्वच्छता, शिक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन आणि समाजातील वंचित घटकांच्या उन्नतीसाठी संत गाडगे महाराज यांनी दिलेले योगदान आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. युवकांनी संत गाडगे महाराजांच्या विचारांवर चालून समाजसेवेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहभाग घेत परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश दिला. या उपक्रमातून स्वच्छता हीच खरी समाजसेवा आहे, हा संत गाडगे महाराजांचा विचार प्रत्यक्ष कृतीतून अधोरेखित करण्यात आला. यावेळी परीक्षाधिकारी प्रा. एस.एल.पवार सर्व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील सर्व घटकांनी सहकार्य केले.

# महायुतीत आणखी भागीदार वाढवू नका : रामदास आठवले

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



रिपब्लिकन पक्ष हा भारतीय जनता पक्षाचा सच्चा साथीदार आणि महायुतीतील भागीदार आहे. महायुती परिपूर्ण झाली असून यापुढे त्यात भागीदार वाढवू नका, असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय नेते व केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी केले. पुणे महापालिका निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला 12 जागा मिळाल्या अशी मागणी देखील त्यांनी केली. पुणे महानगर पालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्यावतीने आश्रम मैदान, डॉ बाबासाहेब आवेडकर महाविद्यालय, नाना पेठ, पुणे येथे 'संकल्प मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आठवले बोलत होते, याप्रकरणी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, शहर प्रभारी शैलेन्द्र चव्हाण, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, परशुराम वाडेकर अशोक कांबळे, अशोक गायकवाड, महिपाल वाघमारे, महेंद्र कांबळे, अशोक शिरोळे, शाम सदाफुले, महिला शहराध्यक्ष हिमाली कांबळे, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, विशाल शेवाळे, यांच्यासह पक्षाचे प्रमुख नेते मेळाव्याकरीता उपस्थित होते.

# टाटा मोटर्सच्या इंडिग्रेटेड व्हिलेज डेव्हलपमेंट प्रोग्रामने चंद्रकांत यांना केले लखपती

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



भारतामध्ये, विशेषत: ग्रामीण व आदिवासी क्षेत्रांमध्ये शेती हा आजही रोजगार व उपजीविकेचा आधारस्तंभ आहे. महाराष्ट्रातील जव्हार येथील एका आदिवासी पाड्यातील शेतकरी चंद्रकांत सोन्या अंधेर एकेकाळी भारतभरातील हजारो शेतकऱ्यांप्रमाणे हालाखीचे आयुष्य जगत होते. केवळ मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण आणि दोन एकरांची पर्जन्याधारित शेतीयोग्य जमीन इतकीच पुंजी गाठीशी असलेल्या चंद्रकांत यांचा उदरनिर्वाह लहरी पाऊस आणि पाण्याची सततची टंचाई यांवर विसंबून होता. चंद्रकांत यांची उर्वरित जमीन शेतीयोग्य नसल्याने त्यांना इतर हंगामांत कुटुंबाला मागे ठेवून आजुबाजूच्या शहरांत मोलमजुरीसाठी जाणे भाग होते – या कामात उत्पन्नाची हमी फार थोडी होती आणि प्रगतीचा कोणताही स्पष्ट मार्ग दिसत नव्हता. टाटा मोटर्सचा इंटिग्रेटेड व्हिलेज डेव्हलपमेंट प्रोग्राम (IVDP) या दुर्गम पाड्यामध्ये आणि चंद्रकांत यांच्या आयुष्यात सर्वांगीण विकासाची आशा घेऊन आला. विविध सरकारी योजनांना एकत्रितपणे केंद्रस्थानी ठेवत स्थानिक समुदायांना सामोरी येत असलेल्या आगळ्यावेगळ्या आव्हानांबरहुकूम बेतलेल्या बहुस्तरीय, शाश्वत कार्यचौकटीच्या अंमलबजावणीत IVDP चे सार सामावलेले आहे. टाटा मोटर्सने चंद्रकांत यांना आपल्या उत्पन्नाला जोड देण्यास मदत व्हावी यासाठी विविध सरकारी योजनांचा लाभ मिळविण्याचे काम सुकर केले. चंद्रकांत यांनी जलसंवर्धनासाठी शेततळे बांधले, तुटपुंज्या पाण्याचा काटेकोरपणे वापर करण्यासाठी ठिबक सिंचन यंत्रणा लावली आणि इंधनावरील खर्च कमी करण्यासाठी बायो-गॅस युनिट बसवले. IVDP ने त्यांना कृषी-वनीकरणांतर्गत वृक्षलागवड, मत्स्यशेतील, सोलर पॅनेल बसविणे, बांबू लागवड व उच्च-मूल्य पिकांसाठी नर्सरी युनिट यांच्या मार्फत पिक व उत्पन्नामध्ये विविधता आणण्यासही मदत केली. या प्रयत्नांचे परिणाम परिवर्तनकारी ठरले आहेत. खात्रीचा जलपुरवठा, शेतीच्या सुधारित पद्धती आणि उत्पन्नाचे विविध स्त्रोत यांच्यामुळे चंद्रकांत यांच्या शेतजमिनीची उत्पादकता मोठ्या प्रमाणात वाढली. आता त्यांना घरगुती गरजा व्यवस्थित पूर्ण करता येतात, वरकड उत्पन्नाची ते विक्री करतात व त्यांच्या वार्षिक उत्पन्नात दुप्पट वाढ झाली आहे. त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणात गुंतवणूक केली आहे, आपल्या कुटुंबाला ते अधिक चांगल्या आरोग्यसेवा पुरवित आहेत व आपल्या जमिनीवर त्यांनी आणखी एक घर बांधले आहे – यातून "लखपती किसान" बनण्याच्या दिशेने त्यांचा प्रवास सिद्ध झाला.

आपल्यातील आमूलाग्र बदलाविषयी आपले विचार व्यक्त करताना चंद्रकांत यांनी सांगितले, "पाण्याच्या अभावामुळे माझी बहुतांश जमीन निरुपयोगी होती आणि मला दरवर्षी आपल्या कुटुंबाला सोडून महिनोंमहिने दूर जाऊन रहावे लागत होते. मात्र टाटा मोटर्सने आम्हाला आशा दिली आणि पुढे जाण्याचा एक व्यवहार्य मार्ग दाखवून दिला. आज, मला स्थलांतरीत होण्याची गरज उरलेली नाही. या आधारामुळे माझ्या कुटुंबाचे नशीब पूर्णपणे नव्याने लिहिले गेले आहे." टाटा मोटर्समध्ये सीएसआर विभागाचे प्रमुख विनोद कुलकर्णी सांगतात, "एक हंगामी, स्थलांतरित मजूर इथपासून ते स्वत:वर विश्वास असलेला, आत्मनिर्भर शेतकरी इथपर्यंतचा चंद्रकांत यांचा प्रवास समुदाय-केंद्री ग्रामीण विकासाच्या पद्धतीची ताकद दाखवून देतो. चंद्रकांत आणि शेतकरी समाजाकडून असुरक्षिततेचे चक्र भेदले जात असताना, त्यामुळे आमची शाश्वत सामाजिक विकास प्रारूपे अधिक व्यापक पातळीवर वापरण्यासाठी व प्रतिकृत करण्यासाठी सरकारी योजनांचा वापर करण्याप्रती आमचा निर्धार अधिकच पक्का झाला आहे."

# वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

■ विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रासोबतच कलाक्षेत्रातही करिअर करण्याची संधी-सचिन जगताप

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

सीताराम सारडा विद्यालयातील विद्यार्थी सर्व क्षेत्रात चांगली कामगिरी करीत आहेत. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत सहभागी होऊन चांगली बक्षीस मिळविली आहेत.विद्यार्थ्यांनी कलाक्षेत्रात अभिनय, नाट्य, चित्रपट, मालिका या नवीन क्षेत्रात सहभागी होऊन आपली अंगभूत कला सादर करावी. अभिनय क्षेत्रात करियर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळेच्या आवारात मुलाखती घेऊन नाट्य व चित्रपट क्षेत्रात त्यांना काम करण्यासाठी अरुणोदय प्रोडक्शनच्या मार्फत सहकार्य केले जाईल.




विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रातील अभ्यासासोबत कलाक्षेत्रातही चांगली संधी निर्माण झाली आहे. असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्य व अभिनेते सचिन जगताप यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाचे सीताराम सारडा विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला.याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप हे होते.तर प्रमुख उपस्थितीत,केमोथेरपीस्ट डॉ.दत्तात्रय अंदुरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक आसिफ शेख, उद्योजक चंद्रकांत औशीकर, माजी विद्यार्थी संघटनेचे विजयराव महांकाळ,शाळेचे चेअरमन अजित बोरा,कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी,प्रा.सौ.ज्योती कुलकर्णी,शालेय समिती सदस्य संजय मुदगल,माजी मुख्याध्यापक विलास साठे, मुख्याध्यापक सुनील सुसरे, विठ्ठल उरमुडे,प्रा.अनुरीता झगडे, सौ.रोहीणी फळे, विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक डोळसे, शिक्षक प्रतिनिधी दीपक आरडे, शिक्षिका प्रतिनिधी सौ दिपाली लगड, शिक्षकेतर प्रतिनिधी गोवर्धन पांडुळे,विद्यार्थी प्रतिनिधी मुशाहिद खान, कु.पायल कोकणे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.दत्तात्रय अंदुरे म्हणाले, विद्यार्थी हे उगवत्या सूर्यासारखे वाटतात.उगवता सूर्य हा प्रभावशाली वाटत नसला तरी तो जसा मोठा होतो.तसा त्याचा प्रभाव दाखवत असतो.शाळेतील विद्यार्थ्यांनी अविस्मरणीय अशी निसर्ग चित्रे रेखाटली आहेत.

विद्यार्थ्यांनी त्यांच्यात असलेली ऊर्जा व कल्पनाशक्ती कायम टिकवून ठेवावी. विजय महांकाळ म्हणाले, सीताराम सारडा विद्यालयातील विद्यार्थ्यांची प्रगती कौतुकास्पद आहे.शाळेतील विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत कला,क्रीडा क्षेत्रात चांगली कामगिरी केली आहे. डॉ.पारस कोठारी म्हणाले, शाळेतील विद्यार्थी मोठ्या उत्साहाने विविध स्पर्धेत सहभागी होत असतात. शालेय जीवनात मिळालेले यश यामुळेच विद्यार्थी घडत असतात.

# अहिल्यानगरचे सुपुत्र विवेक कुलकर्णी यांची बजरंग दल राष्ट्रीय सहसंयोजक पदी निवड

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

उत्तर प्रदेश, हस्तीनापुर येथील प्रसिद्ध जैन धार्मिक तीर्थक्षेत्र मेरठ येथे विश्व हिंदू परिषदेची केंद्रीय प्रन्यासी मण्डल बैठक पार पडली.

या बैठकीत अहिल्यानगरचे सुपुत्र विवेक कुलकर्णी यांची अखिल भारतीय बजरंग दलाच्या राष्ट्रीय सहसंयोजक पदी निवड करण्यात आली.याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष ॲड. अलोक कुमार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पूर्व सरकार्यवाह तथा विशेष हिंदू परिषद पालक आदरणीय भैय्याजी जोशी,आंतरराष्ट्रीय महामंत्री बजरंग बागडा,केंद्रीय संघटन मंत्री मिलींद परांडे, केंद्रीय सहमंत्री प.पू.दादा वेदक, मुंबई क्षेत्र मंत्री रामचंद रामुकाजी,क्षेत्र सह मंत्री प्राचार्य अनंत पांडे,संघटन मंत्री अनिरुद्ध पंडीत, महाराष्ट्र प्रांत मंत्री किशोर चव्हाण,प्रांत सह मंत्री ॲड. सतिश गोरडे, नितीन वाटकर आदी मान्यवर



उपस्थित होते. अहिल्यानगरचे सुपुत्र विवेक कुलकर्णी यांची बजरंग दलाच्या राष्ट्रीय सहसंयोजक पदी निवड करण्यात आली. विवेक दिनकर कुलकर्णी यांचे शिक्षण मेकेनिकल इंजीनियर असे झाले असून बाल्य काळापासून संघ स्वयंसेवक आहेत. पश्चिम महाराष्ट्र येथील अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड हे श्री कुलकर्णी यांचे जन्मगाव आहे. जामखेड तालुका सह कार्यवाह, अहिल्यानगर सह मंत्री विश्व हिंदु परिषद,पश्चिम महाराष्ट्र प्रान्त सह संयोजक, पश्चिम महाराष्ट्र प्रान्तसह मंत्री, मुंबई क्षेत्र बजरंग दल सह संयोजक,मुंबई क्षेत्र बजरंग दल संयोजक अशी अनेक पदे विवेक कुलकर्णी यांनी भुषवली आहेत. जिहादी आतंकवादी देश विरोधी कारवाया,लव जिहाद,धर्मांतरण, गोहत्या बंदी अशा अनेक सामाजिक विषयांवर आंदोलने करून देव देश आणि धर्मासाठी कार्य करीत आहेत. विवेक कुलकर्णी म्हणाले, बजरंग दल हे देशातील हिंदू तरुणांचे मोठे संघटन आहे. अखिल भारतीय बजरंग दलाच्या माध्यमातून गोसेवा,राष्ट्रसेवेचे व हिंदुत्वाचे कार्याचा देशभरातील हिंदू युवकांमध्ये जागर करणे. तसेच हिंदू युवकांना राष्ट्रभक्तीस प्रेरित करून व्यसनांपासून दूर ठेवणे.देशातील लव जिहाद, गोहत्या,धर्मांतरण बंद करणे, जिहादी आतंकवाद या विषयावर समाज प्रबोधन करणे.तसेच बजरंग दलाच्या माध्यमातून देशातील विविध समस्या सोडविणे हे उद्दिष्ट आहे.

# दृष्टिबाधित खेळाडूंना राज्य सरकारकडून सर्वतोपरी मदत करण्यात येणार : मुख्यमंत्री



**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

■ दृष्टिबाधित टी-२० क्रिकेट विश्वविजेत्या महिला संघातील खेळाडूंचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव

भारताच्या दृष्टिबाधित महिला टी-२० क्रिकेट संघाने जागतिक पातळीवर ऐतिहासिक कामगिरी करत अजिंक्यपद पटकावल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीममधील खेळाडूंचा सत्कार केला. महिला खेळाडूंना त्यांच्या सरावात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी व त्यांना आर्थिक सहाय्य, रोजगाराच्या संधी आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी मदत करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमात विश्वविजेत्या संघातील खेळांडूचा सत्कार करण्यात आला. यावेळी क्रीडा व युवक कल्याण आयुक्त शीतल तेली उगले, संघाच्या कर्णधार दीपिका टी.सी., उपकर्णधार व महाराष्ट्राची खेळाडू गंगा कदम, क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाईंड इन इंडियाचे चेअरमन के. जी. महंतेश, क्रीडा विभागाचे उपसचिव सुनील पांढरे, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के यांच्यासह संघातील खेळाडू उपस्थित होते.



## पत्रकार रविंद्र भोर यांना बंधुशोक

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष तथा जेष्ठ पत्रकार रविंद्र भोर यांचे थोरले बंधू व उपद्रव मूल्य शून्य असणारा माणूस म्हणून प्रसिद्ध असलेले चंद्रकांत भोर यांचे अल्पशा आजाराने सोमवार दि:-२२ डिसेंबर रोजी दुःखद निधन झाले. अत्यंत मितभाषी व अजातशत्रू असणारे चंद्रकांत भोर यांचे मागे पत्नी छाया,मुलगा ऋषिकेश,सून तन्वी,नात,मुली रोशनी बोऱ्हाडे व श्रद्धा बरबडे आणि मोठा भोर परिवार आहे.

# कृतिशील अहिल्यानगर संघटनेच्यावतीने पेन्शनर डे उत्साहात

## टाकळी ढोकेश्वर येथील गिताई प्रतिष्ठाण, निसर्गोपचार केंद्रात निसर्ग सहल व स्नेहमेळावा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पेन्शनर डे चे औचित्य साधून कृतिशील अहिल्यानगर जिल्ह्याचे सभासद व टाकळी ढोकेश्वर पंचक्रोशितील श्री. तारकराम झावरे पा.सेवा निवृत्त कृषी अधिकारी व त्यांचे सहकारी यांचे सहकार्याने सभासद नोंदणी अभियान, त्यांनी कष्टाने नगर-कल्याण रोडवर गिताई प्रतिष्ठाण, निसर्गोपचार केंद्र येथे उभारण्यात आलेल्या फार्म हाऊसमध्ये वनऔषधी वृक्ष लागवड, अलौलिक निसर्गदर्शनाच्या सहलीसह पेन्शनर डे उत्साहाने साजरा करण्यात आला. सभेच्या अध्यक्षस्थानी विलास गोसावी हे कृषी तंत्रज्ञ होते.



सकाळच्या पहिल्या सत्रात कृतिशील संघटनेची भूमिका, कार्यकक्षा, आवश्यकता, सामाजिक बांधीलकी याबाबत संघटनेचे अध्यक्ष इंजि. मनोहर पोकळे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.यावेळी अहिल्यानगर जिल्ह्यात महिलांची सभासद नोंदणीचे शतक पूर्ण केल्याप्रित्यर्थ श्रीम. यमुना विखे यांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

तद्रंतर निसर्गरम्य परिसराची पाहणी करताना तारकराम झावरे पा. यांनी वनौषधीबाबत उपयुक्त माहिती दिली. तद्रंतर दुपारी रुचकर भोजनाचा आस्वाद सर्वांनी घेतला.या भोजनाची मेजवाणी श्री. तारकराम झावरे पा. व त्यांचे सर्व सहाकारी यांनी स्वयंस्फूर्तीने सुमारे १५० उपस्थितांना दिली.

दुपारच्या सत्रात पेन्शनर डे संबंधातले महत्व व त्यासंबंधात संघटनेचे उपाध्यक्ष सुनिल पावले,दत्तात्रय बोरुडे,किसनराव लवांडे,किसनराव पायमोडे, विनायक शहाणे, इंजि.हनुमंत देशमुख यांनी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर वित्त विधेयक २०२५ व ८ व्या वेतन आयोगाबाबत विशेष मार्गदर्शन इंजि.पोकळे यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात श्री. विलास गोसावी यांनी संस्थेच्या कामकाजाविषयी अतिशय उपयुक्त माहिती दिली. तसेच ८ व्या वेतन आयोगाबाबत अतिशय महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. भविष्यात सर्वांनी एकत्र येण्याचे महत्व अधोरेखित केले.संघटनेचे सदस्यत्व घेण्यास उपस्थितांपैकी ८० सेवानिवृत्तांनी तर पंचायत समिती सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष श्री.शहाणे यांनी संघटनेत संलग्न होण्याची तयारी दर्शविली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तारकराम झावरे व त्यांचे सहकारी ओंकारेश्वर झावरे,दत्ता ठुबे,चंद्रकांत मुळे. किसनराव पायमोडे,मच्छिंद्र गायकवाड व कृतिशील संघटना, अहिल्यानगरचे पदाधिकारी आदिंनी विशेष परिश्रम घेतले.

# सांस्कृतिक कार्यक्रमामुळे कलागुणांचा विकास

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

आयुष्यातील खरे आनंददायी दिवस हे शाळेतील असतात. विद्यार्थ्यांना मिळणारे पारितोषीक यातून पाठीवर पडणारी कौतुकाची थाप सर्वोच्च असते.या प्रेरणेतून डॉक्टर,वकील,इंजिनीअर, शिक्षक, शास्त्रज्ञ असे विविध पदावरील विद्यार्थी याचा सार्थ अभिमान आहे. म्हणूनच

सांस्कृतिक कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास होते.असे प्रतिपादन आमदार डॉ. किरण लहामटे यांनी केले.

अकोले तालुक्यातील पिंपळगाव नाकविंदा येथील महालक्ष्मी विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी आमदार डॉ.किरण लहामटे विचार मंच्यावरून बोलत होते.




या प्रसंगी पंचायत समितीचे माजी उपसभापती तथा शिवसेनेचे नेते मारूती मेंगाळ,संस्थेचे अध्यक्ष ॲड. वसंत मनकर,माजी उपसरपंच बबनराव आभाळे,गोरख आभाळे,नामदेव लगड,दत्ताजी धुमाळ,राजू पवार,संपत आभाळे,देवराम काळे,केंद्रप्रमुख देवेंद्र आंबेटकर, श्री.वनवे साहेब, रवी रूपवते, सुभाष बगनर,भाऊपाटील बगनर यांसह प्राचार्य सुनिल धुमाळ, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी,पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष ॲड. वसंतराव मनकर यांनी आपल्या कार्याचा अभिमान वाटावा असे काम समाजात करावे.तेव्हाच देश अधीक प्रगतीपथावर जाईल.विद्यालयात विद्यार्थ्यांना चार भिंतीच्या बाहेरील सर्व कला गुण दिले जातात. त्यातून सर्व क्षेत्रात रेकॉर्ड केले आहे.विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमाबरोबरच दप्तर मुक्त अभियान यामार्फत संवाद साधला जातो.असे विचार प्रतिपादीत केले.

यावेळी केंद्रप्रमुख देवेंद्र आंबेटकर यांनी या शाळेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या शासनाच्या उपक्रमात लागोपाठ पहिल्या क्रमांकाचे व दुसऱ्या क्रमांकाचे तालुका पातळीवर बक्षीस प्राप्त केल्याचे प्रतिपादित केले. केंद्रप्रमुख श्री वनवे साहेब यांनी शाळेमध्ये अभ्यासासोबत विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारे सांस्कृतिक कार्यक्रम राबवत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

## पुजा आवारीचे यश

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील प्रवरा पट्ट्यातील इंदोरी गावची कन्या पुजा भाऊसाहेब नवले उर्फ सौ. पुजा योगेश आवारी हिने सन २०२५ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षांमध्ये दैदिप्यमान यश संपादन केले. तीच्या यशाने इंदोरी गावासह तालुक्याचे नाव उंचावले आहे.पुजा आवारी यांनी नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र लोकसेवा परीक्षेत उप-वनसंरक्षण (वर्ग १) अधिकारी, राज्य विक्री निरीक्षक, उद्योग निरीक्षक, शासनाच्या इतर विभागामार्फत सरळ सेवेमध्ये वरीष्ठ लिपीक (अदिवासी विभाग), कनिष्ठ संरक्षक अधिकारी (महिला व बाल विकास विभाग), समाज कल्याण निरीक्षक (समाज कल्याण विभाग) व वरीष्ठ तांत्रिक सहाय्यक (अन्न व औषध विभाग) या ७ परिक्षांमध्ये घवघवीत यश संपादन केले. काल अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी निळवंडे येथे तीच्या या यशाबद्दल गौरव केला.

# कोतकर गट केडगाव मधील ८ जागेवर ठाम

■ उमेदवारांची बैठक संपन्न, सर्व पक्षात खळबळ

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महानगरपालिकेच्या निवडणुकीत महायुती व महा आघाडी होणार का नाही याची सर्व मतदारांमध्ये चर्चा असतानाच आज केडगाव येथे भानुदास कोतकर यांच्या गटाच्या उमेदवारांची बैठक संपन्न झाली. यामध्ये केडगाव मधील आठ जागेवर दावा केला असून पक्षाकडे आठ जागा देण्याची विनंती केलेली आहे यामुळे आता राजकीय पक्षांमध्ये खळबळ उडाली आहे.



भानुदास कोतकर यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीला सागर सातपुते, भूषण गुंड, सविता कराळे, लता बोरगे, प्रतिभा कोतकर, धनश्री कोतकर, महेश सरोदे ,भरत कांबळे ,गौरी नन्नवरे हे उमेदवार उपस्थित होते. यावेळी बोलताना उमेदवार म्हणाले घेतला आम्ही आठ जागा घेणार यामध्ये तडजोड होऊ शकत नाही पक्षाने जर आठ जागा दिल्या तर आम्ही सोळा व सतरा मधील आठ उमेदवार तसेच प्रभाग १५ मधील चार उमेदवार असे १२ उमेदवार निवडून आणून कारण प्रभाग १५ मध्ये कोतकर गटाचे समर्थक व मतदार मोठ्या संख्येने आहेत त्यामुळे १२ पैकी फक्त आठ जागा मागत आहोत याबाबत त्यांनी पक्षाचे फॉर्म पण भरलेले आहे व तशी मागणी ही केलेली आहे.

कारण सध्या महायुतीमध्ये जागा वाटपाचा घोळ चालू असून यामध्ये शिंदे गट व भाजप युती जरी फिक्स असली तरी शिंदे गटाला सन्मान जनक जास्त जागा पाहिजे आहेत तर राष्ट्रवादीची ताकद शहरात जास्त आहे त्या प्रमाणात त्यांनाही जागा हव्यात तशी त्यांच्या कार्यकर्त्यांची मागणी आहे त्यामुळे सर्वच पक्षात हा पेच निर्माण झाला आहे.

त्यातच आज केडगाव ने जर काही वेगळा निर्णय घेतला तर काय? यामुळे सर्वच पक्षात खळबळ उडाली आहे तसेच शहरातील काही प्रभागांमध्ये ४ उमेदवार एकत्र येऊन पॅनल करण्याच्या पण तयारीत आहे.

# गार्गी चव्हाणची आर्चरी मध्ये २ पदके मिळवून राष्ट्रीय स्पर्धेत निवड

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नुकतीच अमरावती येथे १९ /२० डिसेंबर २०२५ रोजी शालेय राज्यस्तरीय आर्चरी स्पर्धेत संपन्न झाली यामध्ये नगरची गार्गी रुपेश चव्हाण हिने १ कांस्य व १ रजत पदक पटकावत राष्ट्रीय स्पर्धेत तिची निवड झाली. क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे,अंतर्गत उपसंचालक क्रीडा व युवक सेवा अमरावती विभाग,जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा कार्यालय तसेच महाराष्ट्र आर्चरी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धा नुकतीच संपन्न झाली.यामध्ये नगरची रहिवासी व सध्या इ.१२ वी मध्ये दादासाहेब घाडगे पाटील विद्यालय इथे शिक्षण घेत असलेली गार्गी चव्हाण हिने २ पदकाची कमाई करून इंफाळ,



मणिपूर राज्य येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेकरिता महाराष्ट्र संघात स्थान पटकावले असून लहान पणापासून तिला क्रीडा क्षेत्राची आवड असून आजपर्यंत तिला अनेक राष्ट्रीय व राज्य स्तरावर पदके मिळवली असून राज्य मिनी ऑलंपिक मध्ये सुवर्ण पदक मिळवले आहे. तिला नगरचे अभिजित व शुभांगी दळवी याचे कडे प्रशिक्षण घेत आहे व त्यांचे मार्गदर्शन आहे.

# मुलांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलन हक्काचे व्यासपीठ

## शाळा समिती सदस्या डॉ. सौ. सुमा वाघ

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी स्नेहसंमेलन उपयुक्त ठरते मुलांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलन हे हक्काचे व्यासपीठ आहे असे प्रतिपादन शाळा समिती सदस्या डॉ. सौ. सुमा वाघ यांनी केले. लालटाकी रोडवरील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेत बालवाडी पूर्वप्राथमिक विभागाचे विविध गुणदर्शन व पारीतोषिक वितरण कार्यक्रमाचे उदघाटन शाळा समिती सदस्या डॉ. सौ. सुमा वाघ यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी संस्थेच्या खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, मुख्याध्यापिका अर्चना गिरी, प्राध्यापिका मनोरमा काटे, बालवाडी विभागप्रमुख लता मोढवे, सुनिल जायगुडे , शिक्षक प्रतिनिधी जयश्री म्याना आदी मान्यवर उपस्थित होते.

सुमा वाघ म्हणाल्या उदयाचा भावी कलाकार या माध्यमातून तयार होत आहे. विद्याथ्यानी स्पर्धेत टिकण्याकरीता विविध कलाही अंगिकारल्या पाहीजेत , शालेय वयातील स्पर्धा या भावी स्पर्धेची चुणूक आहे. आपल्यातील कलागुण ओळखुन स्वतःला स्पर्धेच्या कसावर पारखायची ही संधी आहे. हारण्या जिंकण्यापेक्षा स्वतःला ओळखायला शिका.

मुख्याध्यापिका अर्चना गिरी यांनी प्रास्ताविकेत शाळेच्या प्रगतीची माहीती दिली.तसेच स्टेज डेअरिंग, स्टेजवरचा वाव, एकमेकांशी संवाद साधत दुसऱ्यांना मदत



करण्याची भावना या माध्यमातून वृध्दिगंत होते. देवा श्री गणेशा, येळकोट येळकोट जय मल्हार, ललाटी भंडारा, तेरी बातो से उलझा जिया, मराठी हिट गाणी,मिक्स सॉग तसेच मोबाईल ही थीम घेत मोबाईलचा अति वापरावर उपरोधिक गाण्यावर अश्या विविध गाण्यावर मुलांनी मनमोहक नृत्य सादर करत उपस्थित पालकांची मने जिंकली. प्रा. मनोरमा काटे यांनी यावेळी मनोगत व्यक्त मुलांना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन सुनिता शेवाळे यांनी केले. आभार बालवाडी विभागप्रमुख लता मोढवे यांनी मानले.कार्यकम यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परीश्रम घेतले. मोठया संख्येने विदयार्थी व पालकवर्ग उपस्थित होता.

## याझाकी इंडिया कंपनीमध्ये

# अभियांत्रिकी शाखेच्या २३ विद्यार्थ्यांची निवड

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट,बेल्हे या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये याझाकी इंडिया प्रा.लि.यांच्या वतीने अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाअंतर्गत "ऑनलाईन कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह-२०२५" चे नुकतेच आयोजन करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे यांनी दिली.

या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये इलेक्ट्रिकल,इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग मधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. याझाकी कंपनीच्या एच आर व टेक्निकल पॅनेलमार्फत ऑनलाईन चाचणी व मुलाखती घेण्यात आल्या.




निवड प्रक्रियेत एकूण २३ विद्यार्थ्यांची निवड झाल्याची माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा.सचिन पोखरकर यांनी दिली.निवड झालेल्या विद्यार्थ्यांना याझाकी इंडिया यांच्या रांजणगाव येथील प्रकल्पात इंटर्नशिप देण्यात येणार आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे :- रावा हाके,आदित्य देशमुख,समाधान चौधरी,किशोर भोगाडे,माधुरी शिंदे,दिव्या निलख,रोहन गावडे,साक्षी गोर्डे,साक्षी कोल्हे,सुरज पवार,प्रेरना शिंदे,वैष्णवी जाधव,दत्ता राजापूरे,रोहन वाघ, आफताब मुनावर,कुणाल बडवे,पवन गुंजाळ,सौरभ भडंगे,सोहेल पटेल,तेजस बाचकर,विठ्ठल कोळेकर,किशोर पाल,आरती औटी. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे,प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर तसेच संकुलातील सर्व प्राचार्य,विभागप्रमुख,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# लेक्सस इंडियाने एलएम ३५०एचची वाढ नोंदवत राखली वाढीची गती

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

लेक्सस इंडिया तर्फे आज त्यांच्या महत्त्वपूर्ण एमपीव्ही उत्पादन असलेल्या एलएम ३५० एच या उत्पादनाची उत्तम कार्यक्षमता नोंदवली असून नोव्हेंबर २०२५ च्या तुलनेत ४० टक्के वाढ तर जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान एकंदरीत १५ टक्के वाढ ही गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत नोंदवली आहे. एलएम ३५०एच ही गाडी सातत्याने अल्ट्रा लक्झरी मोबिलिटी क्षेत्रातील अनोखी गाडी ठरली असून यामुळे पाहुण्यांना योग्य डिझाईन सह अधिक आराम आणि सोपेपणा प्राप्त झाला आहे. एलएम ३५० एच चा विकास हा अशा पाहुण्यांच्या पर्सनल जागेपेक्षा अधिक प्रवास करु इच्छिणाऱ्यांसाठी करण्यात आला आहे. अगदी अचूकतेने तयार करण्यात आलेली लक्झरी लाऊंज ऑन व्हील्स अशी ही गाडी असून ती अल्ट्रा लक्झरी मोबिलिटी विभागात आहे. लेक्ससच्या ओमोतेनाशी या तत्वज्ञाना नुसार केबिनचे डिझाईन अगदी अचूक आराम देण्यासाठी करण्यात आले आहे. व्हर्टिकल फीचर्स मध्ये हायब्रीड तंत्रज्ञाना मुळे आरामदायक, जवळजवळ शांत राईड, अचूक हँडलिंग आणि अजोड मागील सीटवरील आरामदायकपणा आपल्याला प्रवासात प्राप्त होतो. चार सीटर आणि सात सीटर च्या पर्यायात उपलब्ध असलेली ही गाडी आराम आणि लक्झरी मोबिलिटी चा अनुभव हा हाय नेटवर्थ इंडिव्हिज्युअल्स आणि अल्ट्रा एचएनआयज ना देतो. लेक्सस इंडिया चे अध्यक्ष श्री. हिकारु इक्युची यांनी सांगितले " आमच्या लेक्सस एलएम ३५०एच वर आमच्या पाहुण्यांनी दाखवलेला विश्वास आणि सातत्यपूर्ण सहकार्यासाठी मी त्यांचा आभारी आहे. हे वाहन शाही आणि योग्यतेचे द्योतक असून यामध्ये शांतता, जागा आणि अत्याधुनिक हायब्रीड तंत्रज्ञानाचे योग्य मिश्रण आहे.







# 'बजाज पुणे ग्रँड टूर ट्रॉफी'चे जयपूरमध्ये अनावरण




**जयपूर : (समर्थ गांवकरी)**

भारतात व्यावसायिक सायकलिंगच्या एका नवीन युगाचे प्रतीक असलेल्या, बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ च्या प्रतिष्ठित आणि वारसा-प्रेरित ट्रॉफीचे आज जयपूरमध्ये अनावरण करण्यात आले. राजस्थानच्या उपमुख्यमंत्री श्रीमती दिया कुमारी आणि पुणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी श्री जितेंद्र दुडी (आयएएस) (रोड रेसचे यजमान शहर) यांच्या उपस्थितीत हा भव्य समारंभ पार पडला.

राजस्थानचे खासदार श्री मदन राठोड; राजस्थानचे क्रीडा सचिव डॉ. नीरज के. पवन (आयएएस); सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष श्री ओंकार सिंग; आणि राजस्थान सायकलिंग असोसिएशनच्या निवड समितीच्या अध्यक्षा श्रीमती सारिका चौधरी देखील या प्रसंगी उपस्थित होत्या. पुणे जिल्हा प्रशासनाने श्री जितेंद्र दुडी (IAS) यांच्या नेतृत्वाखाली आणि महाराष्ट्र सरकारच्या भक्कम पाठिंब्याने आयोजित केलेली बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ ही भारतातील पहिली आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायकलिंग रोड रेस आहे. ही देशातील पहिली UCI २.२ श्रेणीतील रोड रेस असेल, ज्यामध्ये जगभरातील अव्वल सायकलस्वार भारतीय भूमीवर स्पर्धा करतील. आव्हानात्मक मार्ग आणि समृद्ध सांस्कृतिक पार्श्वभूमीसाठी ओळखली जाणारी ही स्पर्धा पुणे आणि भारताला जागतिक सायकलिंग नकाशावर एक प्रमुख ठिकाण म्हणून स्थापित करेल.

# "ज्यांच्याकडे मुख्यमंत्रिपद तेही कायम नाही, मी योग्य क्षणी..."

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यात भाजपने नगरपरिषद निवडणुकीत मोठे यश मिळवले असले तरी, चंद्रपूरमधील निकालाने पक्षांतर्गत वादाला तोंड फोडले आहे. जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांच्या बालेकिल्ल्यात काँग्रेसने मुसंडी मारल्याने मुनगंटीवार प्रचंड आक्रमक झाले आहेत. दरवाजे उघडून बाहेरच्यांना प्रवेश दिल्याचा हा परिणाम असल्याचा म्हणत भाजपला घरचा आहेर दिला होता. त्यानंतर आता मुख्यमंत्रीपद असो वा मंत्रिपद, काहीच शाश्वत नसतं, अशा शब्दांत त्यांनी थेट पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडे आपला रोख वळवला आहे. विदर्भात भाजपने १०० पैकी ५५ जागा जिंकल्या असल्या, तरी चंद्रपूरमध्ये चित्र पूर्णपणे उलट आहे.

# ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर फॅशनमध्ये घडवत आहे क्रांती

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरने या वर्षीच्या पर्वाची सांगता केली, ज्यात फॅशनच्या पारंपरिक संकल्पनांना मोडून काढणारी एक अभूतपूर्व फॅशन कथा सादर करण्यात आली. प्रतिष्ठित हावडा पुलाच्या भव्य पार्श्वभूमीवर आणि शहराच्या ऐतिहासिक हुगळी नदीला एका आलीशान रनवेमध्ये रूपांतरित करून, या अंतिम पर्वात डिझायनर अनामिका खन्ना AK | OK यांचे प्रायोगिक कलेक्शन सादर करण्यात आले. यामध्ये करिश्माई ईशान खट्टर शोस्टॉपर होता, ज्याने डिझाइनला पारंपरिक चौकटींच्या पलीकडे नेले आणि फॅशनला एका नवीन युगात पोहोचवले.




फॅशन डिझाइन कौन्सिल ऑफ इंडिया (FDCI) च्या सहकार्याने सादर केलेल्या या प्रदर्शनाने कारागिरीबद्दलच्या जुन्या समजुतींना आव्हान दिले, आणि तिला एक स्थिर परंपरा न मानता एक जिवंत, विकसित होणारी शक्ती म्हणून सादर केले. अनामिका खन्नाच्या AK | OK ने परिचित पारंपरिक कला प्रकारांना – जरदोझी, चिकनकारी आणि आरसाकाम – वेगळे करून, भविष्यवेधी शिलाई, मेटॅलिक इंटरव्हेंशन आणि कॉस्मिक इन्सपायर्ड ग्राफिक्सद्वारे त्यांना पुन्हा एकत्र आणले.

हा कार्यक्रम हुगळी नदीच्या मध्यभागी नांगरलेल्या एका तराफ्यावर सादर झाला, ज्यामुळे त्याचे एका तरंगत्या फॅशन थिएटरमध्ये रूपांतर झाले. कार्यक्रमाची सुरुवात पाणबुड्यांनी तराफ्यावर येण्याने झाली आणि प्रकाश, धूर व आवाजाच्या साहाय्याने उभारणीला जिवंतपणा देण्यात आला. उत्साही संगीतावर मॉडेल्स रचनेतून बाहेर येऊ लागले. त्यांच्या प्रत्येक पावलासोबत लेझर लाईट्स हालचाल करत होत्या, ज्यामुळे शोमधील उत्सुकता आणि ऊर्जा वाढत गेली. शो ने खरा कळस गाठला तो मजबूत चेनमेल पोशाखांच्या सादरीकरणाने, जे एकसंध आणि प्रभावी वाटत होते.

# महाराष्ट्रातील निवडणुकांमध्ये भाजप पुन्हा नंबर १चा पक्ष

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या संघटन, रणनीती आणि नेतृत्वाचा विजय

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे विकासाभिमुख राजकारण व भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे संघटन कौशल्य आणि अचूक निवडणूक नियोजन यांच्या जोरावर भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्रात प्रथमच नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक निकालात अभूतपूर्व असे यश मिळवले आहे. महाराष्ट्रातील भाजपा कार्यकर्त्यांच्या मुखातून देवेंद्र आणि रविंद्र या जोडगोळीचा नेहेमी होणार आदरार्थी उल्लेख आजच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालांनी आज सार्थ ठरवला. यंदाच्या निवडणुकीत प्रचारगीतातून गाजलेले "तुमची आमची भाजपा सर्वांची" हे बोल महाराष्ट्रातील जनतेने खरे करून दाखवले, हे या निकालावरून सिद्ध झाल्याचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.




रविंद्र चव्हाण यांनी सहा महिन्यांपूर्वी प्रदेशाध्यक्ष पदाची धुरा हाती घेतल्यानंतर अतिशय शिस्तबद्धपणे आणि संयम व आक्रमकपणाच्या अनोख्या शैलीतून महाराष्ट्र पिंजून काढला. यादरम्यान अनेक दिग्गज नेते त्यांनी भाजपात आणले. कोकणात वर्चस्व असलेल्या रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाचा खरंतर या निवडणुकांच्या निमित्ताने कस लागला, त्यात रविंद्र चव्हाण पैकीच्या पैकी गुणांनी उत्तीर्ण झाल्याचे आज स्पष्ट झाले. राज्यात अनेक ठिकाणी शिंदेसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्याशी भाजपाची लढत होती. मात्र देवेंद्र फडणवीस यांच्या चातुर्यामुळे आणि रविंद्र चव्हाण यांच्या संघटन कौशल्यामुळे अनेक ठिकाणी लढत जिंकली.

मात्र त्याचवेळी राज्यात सत्तास्थानाला किंवा महायुतीला बाधा पोहोचणार नाही, याचं गणित देवेंद्र फडणवीस आणि रविंद्र चव्हाण यांनी एकत्रितपणे अचूक सोडवले. याबरोबरच सेनेच्या आणि राष्ट्रवादीच्या दुसऱ्या फळीला भाजपने त्यांची जागाही दाखवली असे दिसते. श्रीकांत शिंदे यांच्याशी असलेले रविंद्र चव्हाण यांचे प्रेम व तिरस्कार असे दुहेरी संबंध गेल्या काही दिवसांतील भाजपा पक्ष प्रवेशामुळे अधिक गहिरे होतील का? अशी शक्यता आजच्या निकालांमुळे झाली आहे. जानेवारीत होऊ घातलेल्या महापालिका निवडणुकांच्या बाबतीतही देवेंद्र-रविंद्र यांची किमया चालेल अशीच शक्यता अधिक असल्याने मात्र महायुतीतील सहकारी पक्ष आता कशी व्यूहरचना करतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# नगरपरिषद निवडणुकीतील यश भाजपाचंच की 'इनकमिंग'चं?

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीच्या निकालात भारतीय जनता पक्षाने मोठी मुसंडी मारली असली, तरी हे यश भाजपच्या मूळ ताकदीचे नसून आयात केलेल्या नेत्यांचे आहे, अशी खोचक टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. भाजपने बाहेरच्या ताकदवान नेत्यांना पक्षात घेऊन स्वतःचा विस्तार केला आहे, त्यामुळे हे यश पक्षाच्या विचारधारेपेक्षा व्यक्तींच्या वैयक्तिक ताकदीवर अधिक अवलंबून असल्याचे विश्लेषण सुप्रिया सुळेंनी केले. नुकत्याच झालेल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीत महायुतीने, विशेषतः भाजपने अनेक जिल्ह्यांमध्ये वर्चस्व राखले आहे.

# समृद्धीसाठी संस्कृतिक मूल्यांना महत्त्व देणे आवश्यक

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

"इनोव्हेशन, सेल्फ रिलायन्स अँड प्रॉस्पेरिटी" या संकल्पनेवर आधारित 'वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक फोरम (डब्ल्यूएचइएफ) २०२५'या दोन दिवसीय परिषदेचे उद्घाटन शुक्रवारी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत करण्यात आले. याप्रसंगी मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. मोहन यादव, 'डब्ल्यूएचइएफ'चे संस्थापक स्वामी विज्ञानंद, 'डब्ल्यूएचइएफ'च्या आयोजन समितीचे अध्यक्ष श्री. राजेश शर्मा आणि श्री. हरी मोहन बांगुर, अध्यक्ष, श्री सिमेंट लि.; श्री. सज्जन जिंदाल, अध्यक्ष, जेएसडब्ल्यू समूह आदी आघाडीचे उद्योगपती, धोरणकर्ते, स्टार्टअपचे संस्थापक, व्यावसायिक नेते आणि गुंतवणूकदार उपस्थित होते.

भारतात असलेली प्रतिभा, संसाधने आणि तंत्रज्ञान आदी अंगभूत सामर्थ्यांवर भर देत,



भारताला नेतृत्व किंवा प्रेरणा घेण्यासाठी बाहेर पाहण्याची तथा इतर देशांवर अवलंबून राहण्याची गरज नाही, असे प्रतिपादन श्री. हरी मोहन बांगुर यांनी केले. हे भाषण उद्घाटन सत्राचे मुख्य आकर्षण ठरले. या वेळी श्री. बांगुर यांनी महाराष्ट्रात २,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याबाबतचे आशयपत्र मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केले. नवकल्पनांबद्दल बोलताना, श्री. बांगुर यांनी ऊर्जा कार्यक्षमतेतील तांत्रिक प्रगतीबाबत 'श्री सिमेंट'चा दाखला या वेळी दिला. 'भारतातील वीज निर्मिती केंद्रांत साधारणपणे 60 टक्क्यांपेक्षा कमी क्षमतेने उत्पादन झाल्यास ते बंद पडतात किंवा पाडले जातात. या पार्श्वभूमीवर आमच्या अभियंत्यांनी काही अभिनव बदल केले आणि क्षमता वापराची मर्यादा कमी केली, ज्यामुळे आम्ही आमचे वीज प्रकल्प ३० टक्के क्षमतेवर चालवू शकलो. यामुळे कोळशाचा मोठा अपव्यय टळला. ऊर्जा मंत्रालयाने या नवकल्पनेची दखल घेत आमच्या अभियंत्यांकडून त्याबाबत माहिती घेतली,' असे त्यांनी सांगितले.

मानसिकतेत बदल करण्याची गरज व्यक्त करत ते पुढे म्हणाले, 'आपण स्वतःला बंधनातून मुक्त केले पाहिजे आणि आपल्या विचारांमध्ये आणि शिक्षणात नवकल्पना आणल्या पाहिजेत.'

'वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक फोरम'हे सहकार्य आणि संवादासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी केले.

# सुंबा आर्टफेस्ट 2025 मध्ये कलानिधी पुरस्कार प्रदान



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुण्यात पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन,घोले रोड येथे सुंबरान आर्ट फाऊंडेशन तर्फे आयोजित सुंबा आर्टफेस्ट 2025 मध्ये कलानिधी पुरस्कार प्रदान करण्यात आले.पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल पद्मश्री वासुदेव कामत व पद्मश्री अच्युत पालव या दोन दिग्गज कलाकारांचा ट्रस्टमार्फत या सोहळ्यात सन्मान करण्यात आला.एथनोग्राफी छायाचित्रकार श्री. श्रीकृष्ण परांजपे यांना कलानिधी कृतज्ञता पुरस्कार २०२५ तसेच कागदी शिल्पकार व चित्रकार श्री. सतीश घाटपांडे व व्हीनस ट्रेडर्स चे संचालक सुरेंद्रभाई करमचंदानी यांना कलानिधी कलागौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी चैत्रा क्रिएशन्सच्या संस्थापिका व उद्योजिका तसेच कै. प्रा. गुरव यांच्या कन्या चित्रा मेटे उपस्थित होत्या. ज्येष्ठ चित्रकार कै.प्रा.रावसाहेब गुरव यांच्या स्मरणार्थ आयोजित सुंबा आर्टफेस्ट 2025 चे 22 डिसेंबर पर्यंत सुरू राहणार असून आदिवासी कलाकृती लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न आहे.

# मृत सिद्धेश कडलगच्या कुटुंबीयांची भेट घेत पालकमंत्र्यांनी केले सांत्वन

**संगमनेर खुर्द : (समर्थ गांवकरी)**

संगमनेर तालुक्यातील बिबट्यांचा वाढता वावर व मानवी वस्त्यांवरील हल्ल्यांच्या घटना रोखण्यासाठी वन विभागाने 'हायटेक' यंत्रणेचा वापर करावा. ज्या भागात बिबट्यांची घनता जास्त आहे, तिथे 'थर्मल ड्रोन', 'नाईट व्हिजन कॅमेरे' व ५०० हून अधिक 'ट्रॅप कॅमेरे' तैनात करण्यात आले आहेत,अशी माहिती जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे. संगमनेर तालुक्यातील जवळे कडलग येथे बिबट्याच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झालेल्या चिमुकल्या सिद्धेश सुरेश कडलग याच्या कुटुंबीयांची पालकमंत्री श्री.विखे पाटील यांनी आज निवासस्थानी जाऊन सांत्वनपर भेट घेतली. त्याप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी आमदार अमोल खताळ, उप वनसंरक्षक धर्मवीर साळविठ्ठल, उपविभागीय अधिकारी अरूण उंडे, पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, तहसीलदार धीरज मांजरे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री विखे पाटील यांनी मृत सिद्धेशचे आजोबा, आजी, वडील सुरेश कडलग व नातेवाईकांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. ही घटना अत्यंत वेदनादायी असून शासन या दुःखद प्रसंगी पूर्णपणे कडलग कुटुंबीयांच्या पाठीशी असल्याचे त्यांनी आश्वस्त केले. शासनाकडून मिळणारी आर्थिक मदत व वन विभागाचे लाभ तातडीने उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

बिबट्या प्रवण क्षेत्रात प्रशासनाने राबविलेल्या उपाययोजने बाबत बोलताना श्री.विखे पाटील म्हणाले , वन विभागाच्या ताफ्यात नव्याने २२ गस्ती वाहने व ५ नवीन गन (बंदुका) दाखल होत आहेत. ही मोहीम पुढील ४ ते ६ महिने प्रभावीपणे राबविण्यात येईल. बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पिंजरे लावण्यासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर त्यांनी भर दिला.

२२ जानेवारीपर्यंत रस्ते व कालव्यांवरील अतिक्रमण काढा बिबट्याच्या हल्ल्यासारख्या आपत्कालीन परिस्थितीत मदत पोहोचवण्यासाठी रस्ते मोकळे असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे कालव्यांच्या कडेला व वन विभागाच्या हद्दीतील रस्त्यांवर झालेली अतिक्रमणे तात्काळ हटविण्याचे कडक आदेश पालकमंत्र्यांनी दिले. हे रस्ते 'सार्वजनिक हिताचे' (Public Purpose) असल्याने प्रसंगी पोलीस बळाचा वापर करून, येत्या २२ जानेवारीपर्यंत रस्ते मोकळे करावेत व त्यांचे मुरमीकरण करून ते वाहतुकीयोग्य करावेत, असे स्पष्ट निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी लोकसहभागाची गरज शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शाळांच्या संरक्षक भिंतींची उंची वाढविण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. मात्र, वाड्या-वस्त्यांवरून येणाऱ्या मुलांच्या सुरक्षेसाठी गावकऱ्यांनी लोकसहभागातून पुढाकार घेण्याचे आवाहन ना. विखे पाटील यांनी केले. रोटेशन पद्धतीने ट्रॅक्टर किंवा सुरक्षित वाहनांची व्यवस्था करून मुलांना शाळेत सोडणे व आणणे ही पद्धत अवलंबिल्यास विद्यार्थ्यांची सुरक्षा सुनिश्चित होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

'रेसक्यू सेंटर'ची संकल्पना यावेळी वन संवर्धन व पर्यटनाला चालना देण्यासाठी गोरक्षनाथ गड परिसरातील वन विभागाच्या २०० ते २५० एकर जमिनीवर बिबट्यांसाठी 'रेसक्यू सेंटर' विकसित करण्याची संकल्पना पालकमंत्र्यांनी मांडली. ही जागा वन विभागाकडे हस्तांतरित करून तिथे निसर्ग संवर्धनाचे उपक्रम राबविण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी, वन विभागाचे अधिकारी, महसूल विभागाचे अधिकारी, ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.